# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ०९ मार्च, २०१८ / फाल्गुन १८, १९३९ (शके)**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८५**

---

### अर्धवेळ शिक्षकांना पुन्हा सेवेत समाविष्ट करण्याबाबत

**(१) * ३७८९७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक ३३४९० ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत निम्या पेक्षा कमी कार्यभरासाठी अर्धवेळ शिक्षकांची नेमणूक केली असून सदर अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ शिक्षकांप्रमाणे वेतनवाढी, महागाई भत्ते, सेवा पुस्तके तसेच विविध शैक्षणिक लाभ देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच संच मान्यतेमध्ये अर्धवेळ शिक्षक दर्शविण्यात येत नसल्याने संच मान्यतेशिवाय वेतन देयके पारित होत नसल्याने राज्यात अर्धवेळ शिक्षकांच्या नोकरीचा व सेवा शाश्वतीच्या अडचणी निर्माण होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्ण वेळ शिक्षक विद्यार्थी संख्येने अतिरिक्त झाल्यास त्यांचे इतर शाळांमध्ये समायोजन करण्यात येते परंतू अर्धवेळ शिक्षक अतिरिक्त झाल्यास त्यांना सेवेत पुन्हा समायोजित करण्यात येत नसल्याने सदर शिक्षकांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर याचिकेनुसार राज्यातील अर्धवेळ शिक्षकांना सेवेत पुन्हा दाखल करून पूर्णवेळ करण्याबाबत व त्यांचे ऑनलाईन वेतन देवून त्यांना सेवा सातत्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे आहे

(४) उक्त याचिकेतील मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्राथमिक/माध्यमिक शाळांमधील शिक्षक/कर्मचाऱ्यांना विनाअट वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(२) * ३७७७३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासनमान्य प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, १९८६ पासून मूळ वेतनश्रेणी, वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड वेतनश्रेणी अशी त्रिस्तरीय वेतनेश्रेणी लागू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती दिनांक १ ऑक्टोबर, १९९५ पासून लागू करण्यात आली असून शिक्षकांना १२/२४ वर्ष सेवेनंतर देय ठरलेली वरिष्ठ/निवड वेतनश्रेणी पदोन्नती न समजता निर्धारित अटीच्या आधारे देण्यात येते परंतू शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १२/२४ वर्ष सेवेनंतर विनाअट/सरसकट कालबध्द पदोन्नती, पदोन्नती समजून देण्यात येते, यावरुन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामध्ये भेदभाव करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण करण्याच्या अटीवर वरिष्ठ/निवड वेतनश्रेणी देय ठरते परंतू प्राथमिक/माध्यमिक शाळेतील शिक्षकांना मात्र सेवांतर्गत प्रशिक्षण केल्याशिवाय वरिष्ठ/निवड वेतनश्रेणी देय ठरत नाही, याप्रकरणी उच्च माध्यमिक शिक्षक व माध्यमिक/प्राथमिक शिक्षक असा भेदभाव करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक/कर्मचाऱ्यांना विनाअट वरिष्ठ/निवड वेतनश्रेणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) शिक्षकांना विनाअट वरिष्ठ/निवड वेतनश्रेणी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याबाबत

**(३) * ३८८७५ श्री.बाळाराम पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.कपिल पाटील, श्री.रविंद्र फाटक, श्री.चंद्रकांत रघुवंशी, ॲड.अनिल परब, श्री.सतिश चव्हाण, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (आरटीई) मधील कलम ६ अन्वये मुलांना पहिली ते पाचवीपर्यंतचे शिक्षण घरापासून एक किलोमीटर तर पाचवी ते आठवीपर्यंतचे शिक्षण घरापासून तीन किलोमीटरच्या आत शाळा पाहिजे असे असून देखील शासनाने १३०० शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असतानाच शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री.नंदकुमार यांनी राज्यातील एक हजार पटसंख्याखालील ८० हजार शाळा बंद करण्यात येत असल्याचे जाहिर केले तसेच दिनांक ३० मार्च, २०१६ शासन निर्णयात २५० पटसंख्या खालील असणाऱ्या शाळा शासनाला चालविण्यात स्वारस्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आल्याने शिक्षण हक्क कायद्याचा भंग होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णय हा शिक्षण हक्क अधिनियमाचे उल्लंघन करणारा असून ग्रामीण भागातील तसेच महागडे शिक्षण न परवडणाऱ्या विद्यार्थ्यांवर याचा परिणाम होणार असल्याने तो मागे घेऊन कमी पटाच्या शाळा चालविण्यासाठी शासनाने सर्वंकष धोरण निश्चित करावे अशी विनंती राज्यातील २५ हून जास्त शिक्षणतज्ज्ञांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा

त्यासुमारास ई-मेलच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्री यांना केलेली असून त्याची प्रत मा.शालेय शिक्षण मंत्री यांना पाठविलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात दिनांक १८ एप्रिल, २००० च्या शासन निर्णयानुसार वस्त्या, वाड्या, पाडे अशा ठिकाणी शिक्षणाची सोय व्हावी यासाठी सुरु करण्यात आलेल्या १३१४ प्राथमिक शाळा स्थलांतरित अथवा बंद करण्याची नोटीस राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहात केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या शिक्षणतज्ञांमध्ये होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. सुब्रम्हण्यम, टाटा सामाजिक विज्ञान केंद्राचे डॉ. नंदिनी मांजरेकर, नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टीडीजचे संचालक अमित नारकर, युसूफ मेहर अली विद्यालयाच्या विजया चौहान, आनंद करंदीकर, किशोर दरक, अरुण ठाकूर इत्यादींचा समावेश असून विविध शिक्षक संघटना, पालकवर्गाच्या संघटना यांनी तीव्र विरोध केला, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शाळांचे कंपनीकरण व आंतरराष्ट्रीय शाळा सुरु करण्याबाबत शासनाचे धोरण व उद्देश काय आहे तसेच संचमान्यता, पटसंख्या या संबंधिचे शासन निर्णय जारी करण्यात आल्याने जिल्हा परिषदेच्या तसेच अनुदानित संस्थांच्या शाळा यांच्यावर परिणाम झाल्याबाबत वस्तुस्थिती व तपशील काय आहे तसेच शाळा बंद करण्यासाठी कोणते निकष ठरविण्यात आले आहेत वा ठरविण्यात येत आहेत, तसेच उक्त निर्णय घोषित करुन शैक्षणिक वातावरणात असंतोष निर्माण करणाऱ्या प्रधान सचिव श्री.नंदकुमार यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्यावतीने नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोन शाळेच्या अंतराची तफावत मराठवाडा, विदर्भ व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होत असून कोकण भागातील अधिकतम शाळा बंद होणार असल्याने दुर्गम भागातील मुलांचे भविष्य लक्षात घेता सदरचा शासन निर्णय दुर्गम भागातील शाळांसाठी शिथिल करण्याबाबत तसेच वस्त्या, वाड्या, पाडे आदि ठिकाणची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

(२) राज्य शासनाने १० पेक्षा कमी पट असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजिकच्या शाळेत करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने ई-मेल प्राप्त झालेला आहे.

(३) राज्य शासनाने या अनुषंगाने "द हिंदु" या वृत्तपत्रातील वृत्ताची दखल घेऊन राष्ट्रीय मानवधिकार आयोगाने राज्य शासनास विद्यार्थी समायोजनापूर्वी पडताळणी करण्याबाबत व त्यानुषंगाने खुलासा सादर करण्याबाबत नोटीस दिली होती. सदर नोटीशीस अनुसरून राज्य शासनाने राष्ट्रीय मानवधिकार आयोगास दिनांक २४/०१/२०१८ रोजी खुलासा सादर केलेला आहे.

(४) होय.

(५) व (६) कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ८(१)(अ) खालील तरतुदीनुसार धर्मादाय उद्दिष्टासाठी नोंदणीकृत झालेल्या कंपनीस शैक्षणिक क्षेत्रात कार्य करण्याची इच्छा असल्यास तशी संधी मिळावी, याकरीता महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मध्ये तशी सुधारणा करण्यासाठी सुधारणा विधेयक मंजूरीसाठी विधीमंडळाच्या विचाराधीन आहे.

तसेच राज्यातील शाळा आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मानके प्राप्त करणाऱ्या शाळा असाव्यात तसेच राज्यातील मुलांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्तम शिक्षण देता यावे. यासाठी राज्यात, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभाग, शालेय शिक्षण विभाग यांच्या शाळांमधून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १०० शाळा निर्माण करण्याचा शासन निर्णय दिनांक १४/१०/२०१६ नुसार घेण्यात आला आहे.

तसेच शाळांमधील पटसंख्येच्या अनुषंगाने, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ च्या अनुसूचीमधील तरतुदींशी सुसंगत असे संच मान्यतेचे निकष शासन निर्णय, दिनांक २८/८/२०१५ अन्वये निश्चित केले आहेत.

तसेच खालावत चाललेल्या पटसंख्येच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या शाळेत केल्यास विद्यार्थ्यांना समाजिकरण व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याची संधी मिळेल, या भूमिकेतून शासनाने कमी

पटसंख्येच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या शाळेत करण्याचा निर्णय घेतला आहे. सदरचा निर्णय घेताना Rationalization of Small Schools in Maharashtra संदर्भात Unicef यांचा चंद्रपूर जिल्ह्यासंदर्भातील अहवाल विचारात घेण्यात आला होता. यासंदर्भात शासनास प्राप्त झालेली लोकप्रतिनिधींचे व अन्य निवेदने लक्षात घेता, या सर्व शाळांबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात आली असून १२९२ शाळांपैकी, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ चे उल्लंघन न करता ५६८ शाळांचे समायोजन करण्याच्या सूचना शासनाने शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना दिनांक ०३/०२/२०१८ पत्रान्वये दिल्या आहेत.

---

## राज्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध अहवाल मंजूर करण्याबाबत

**(४) * ३८१४१ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.कपिल पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८६६ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१४ मध्ये राज्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतिबंधामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे निश्चित करण्यासाठी नेमलेल्या समितीची तसेच शिक्षकेतर आकृतिबंधाबाबत दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ अन्वये नियुक्त समितीच्या अहवालातील शिफारशी विचारात घेण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधाबाबत समितीने दिलेला अहवाल मंजूर करण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील शाळांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर आणि ग्रंथपाल नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कर्मचारी भरतीबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त पदे निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध मंजूर करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर चालू आहे.

---

## राज्यात स्टेंटच्या किंमती व गुणवत्तेमध्ये फेरफार करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत

**(५) * ३९०२४ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३९२ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय औषध किंमत नियंत्रण प्राधिकरणाने हृदयशस्त्रक्रियेमध्ये लागणाऱ्या स्टेंटच्या किंमती निर्धारित करण्यात येवूनही काही रुग्णालयांकडून या निर्देशाचे पालन करण्यात येत नसल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमांचे उल्लंघन करुन स्टेंटच्या किंमती व गुणवत्तेमध्ये काही रुग्णांलयामधून फेरफार केले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्टेंटच्या किंमती व गुणवेत्तेमध्ये फेरफार करणाऱ्या रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय औषध किंमत नियंत्रण प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या किंमतीपेक्षा जास्त किंमतीत हृदयशस्त्रक्रियेमध्ये लागणाऱ्या स्टेंटची विक्री केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

अशी बाब प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नातेपुते (जि.सोलापूर) येथील विद्‌यार्थी जवाहर नवोदय परिक्षेपासून वंचित राहिल्याबाबत

**(६) * ३८८७७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नातेपुते (जि.सोलापूर) येथे केंद्र शाळेतील प्रशासकीय चुकीमुळे जवाहर नवोदय परिक्षेपासून ३७ विदयार्थी वंचित राहिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जवाहर नवोदय परिक्षेपासून वंचित राहिलेल्या विदयार्थ्यांना परिक्षेला प्रवेश देण्याबाबत कार्यवाही करुन या प्रकरणास जबाबदार असलेल्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम व अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन देण्याबाबत

**(७) * ३८८१४ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागातील नव्याने निर्माण झालेल्या वाशिम व अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना चार-चार महिने वेतनापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत वारंवार मागणी होवून सुध्दा त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जैवतंत्रज्ञान विषय अनुदानित करुन शुल्क परतावा देण्याबाबत

**(८) * ३८७१८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जैवतंत्रज्ञान हा अभ्यासक्रम विनाअनुदानित तत्वावर १०० महाविद्यालयात शिकविला जात असून ५०,००० विद्यार्थी या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा अभ्यासक्रम विनाअनुदानित असल्याने विद्यार्थ्यांना रूपये ३० ते ४० हजार शुल्क भरावे लागत असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा अभ्यासक्रम विनाअनुदानित असल्याने व रसायने, अत्याधुनिक उपकरणेही महाग असल्याने प्रत्येक महाविद्यालयात ती उपलब्ध होत नाहीत व विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुर्ण शिक्षण घेण्यास अडचणी येतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जैवतंत्रज्ञान हा महत्वाचा विषय असल्याने तो अनुदानित करणेसाठी व महाविद्यालयाने आकारलेल्या शुल्काचा पुर्ण परतावा देणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे,

(२) अंशत: खरे आहे,

(३) खरे नाही. तथापि, ज्या महाविद्यालयात जैवतंत्रज्ञान अभ्यासक्रमाशी संबंधित सोईसुविधा उपलब्ध आहेत त्याच महाविद्यालयांना विद्यापीठामार्फत संलग्निकरण देण्यात येते.

(४) व (५) शासनाच्या दिनांक २४/०९/१९९१ च्या पत्रानुसार कॉम्प्युटर सायन्स/अभियांत्रिकी विज्ञान व तद्नुषंगिक विषयही पदवीस्तरावर कायम विनाअनुदानित तत्वावर मंजूर करण्यात येतात. नवीन महाविद्यालयांच्या प्रस्तावात अथवा अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन विद्याशाखा सुरु करण्याच्या प्रस्तावात विद्यापीठाने हे विषय दिले असल्यास ते कायम विनाअनुदानित तत्वावर आहेत असे समजावेत असे स्पष्ट करण्यात आले आहे. यानुसार जैवतंत्रज्ञान हा विषय कायम विनाअनुदानित तत्वावर असल्याने त्यास अनुदान देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी “राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना” लागू करण्यात आली असून त्यामध्ये जैवतंत्रज्ञान विषयाचा समावेश आहे.

---

## राज्यातील रात्रशाळा व रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याबाबत

**(९) * ३९१२४ श्री.परिणय फुके, श्री.कपिल पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३६०२३ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रात्रशाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयाचे शिक्षक देण्याच्या मागणीसाठी उपशिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयासमोर दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शने केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील रात्रशाळा व रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना माहे जून पासून ९ महिने काम करुनही वेतन मिळाले नसून शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी मुंबईतील रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतनही मागील चार महिन्यापासून दिले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रात्रशाळेत अर्धवेळ काम केलेल्या व शासनाने अशा रात्र शाळांना पूर्णवेळ रात्रशाळेचा दर्जा दिलेला असतानाही या रात्रशाळांमधील शिक्षकांचे वेतन मागील ५ महिन्यापासून बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त शिक्षक शिक्षकेतर अर्धवेळ कर्मचाऱ्यांना सेवाशर्ती नियमावली १९८१ अनुसार सेवा संरक्षण व इतर लाभ व भत्ते देण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रात्र कनिष्ठ महाविद्यालयाप्रमाणे रात्र माध्यमिक शिक्षकांना पुन्हा सेवेत घेण्याबाबत व रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतन थकबाकी सव्याज देण्याबाबत तसेच रात्र शाळेतील शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

काही शाळांच्या मुख्याध्यापकांनी स्वाक्षरीचे अधिकार उशिराने प्राप्त करुन घेतल्याने विलंब झालेला आहे. तसेच काही शिक्षकांचे तांत्रिक अडचणीमुळे वेतन प्रलंबित आहे.

(४) व (५) रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील दुबार सेवा करणाऱ्या शिक्षकांच्या सेवा समाप्त करण्यात आलेल्या होत्या. तथापि, विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होऊ नये म्हणून आवश्यक तेथे त्यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात पुन्हा चालू ठेवण्यात आल्या, मात्र तत्पुर्वी त्यांच्या नावाचा अंतर्भाव शालार्थ वेतन प्रणालीतून वगळल्यामुळे तसेच काही रात्रशाळेनी वेतनाची देयके विंलबाने सादर केल्याने, सेवासातत्य मिळालेल्या शिक्षकांचा अंतर्भाव शालार्थ वेतनप्रणाली सद्य:स्थितीत तांत्रिक कारणास्तव सुरु नसल्याने अशा शिक्षकांच्या वेतनाची देयके प्रलंबित आहेत. ऑफलाईन वेतन काढण्याची परवानगी दिली आहे.

दिनांक १७/०८/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीबाबत महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ व नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मुल्यांकनास पात्र झालेल्या विनाअनुदानित वर्ग, तुकड्या व शाळांचे मुल्यांकन करण्याबाबत

**(१०) * ३८८५४ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुल्यांकनास पात्र झालेल्या विनाअनुदानित वर्ग, तुकडया व शाळांचे मुल्यांकन झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र वर्ग, तुकडया व शाळांचे मुल्यांकन करुन अनुदानास पात्र घोषित करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी मुल्यांकनानुसार अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तसेच, शासन निर्णय, दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ अन्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(२) याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक/शिक्षकेतरांना सावित्रीबाई फुले-फातिमा शेख आरोग्य कुटुंब योजना लागू करण्याबाबत

**(११) * ३८९६२ श्री.कपिल पाटील, डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेप्रमाणे राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी सावित्रीबाई फुले-फातिमा शेख कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याची घोषणा मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी केल्याच्या अनुषंगाने सदर योजना लागू करण्याबाबतची शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणीबाबत कोणता निर्णय घेण्यात आला व योजनेचे स्वरुप काय आहे तसेच ही योजना केव्हापासून लागू करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर योजनेत नामांकित रुग्णालये आणि सर्व आजार, परिविक्षाधीन शिक्षक, अर्धवेळ शिक्षक तसेच सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, कंत्राटी शिक्षक व कर्मचारी यांचा समावेश करण्यात आला आहे काय,

(४) तसेच राज्यातील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वैदयकीय खर्चाची देयके मंजूर करण्याच्या प्रक्रियेऐवजी कॅशलेस स्मार्टकार्ड योजना लागू करण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२), (३), (४) व (५) खरे नाही. तथापि, राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याची घोषणा मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी केली होती. सदर योजना लागू करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध शहरातील प्रदूषण नियंत्रण आणण्याबाबत

**(१२) * ३७७०५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक वायू प्रदूषित शहर म्हणून नागपूर, अमरावती व चंद्रपूरचे नाव प्रथम १० शहरांच्या नावामध्ये समाविष्ट असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हा सर्वाधिक प्रदूषित जिल्हा म्हणून ओळखला जात असून दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ७ डिसेंबर, २०१७ या कालावधीत जवळपास दोन लाख नागरीक प्रदूषणग्रस्त आढळून आले असून त्यापैकी १२ हजार ४५३ नागरिक गंभीर स्थितीत रूग्णालयात उपचार घेत असल्याचे वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील आकडेवारीवरून स्पष्ट झाल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ग्रीन सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपूर शहरामध्ये दिवसेंदिवस प्रदूषणात वाढ होत असून गर्भवती मातेचा गर्भधारणापूर्व एक महिना आणि गर्भधारणेनंतर एक महिन्यात प्रदूषणाशी संबंध आल्यास जन्माला येणाऱ्या बाळामध्ये जोडलेले ओठ, चिकटलेली टाळू किंवा व्यंग असलेले हृदय असे अर्भक जन्माला येऊ शकते, असा अहवाल बालकांच्या आजारांशी संबंधित जर्नल ऑफ पिडीयाट्रिक या विज्ञानविषयक अंकात माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिद्ध केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई, ठाणे, कल्याण, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती व चंद्रपूर शहरातील प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशातील ९४ शहरांचा सर्वाधीत वायु प्रदूषित शहरे म्हणून समावेश केला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील १७ शहरे अंतर्भुत असून त्यात नागपूर, चंद्रपूर व अमरावती या शहरांचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

(३) इंडियन जर्नल ऑफ पिडीयाट्रिक यांच्या संकेतस्थळावर जानेवारी, २०१८ मध्ये ध्वनी प्रदूषणाचा बालकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामाबाबतचा लेख प्रसिध्द झाला होता, हे खरे आहे.

तथापि, नागपूर महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार नागपूर महानगरपालिकेंतर्गत कार्यरत दवाखान्यामध्ये १ जानेवारी, २०१६ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत जोडलेले ओठ, चिकटलेली टाळू किंवा व्यंग असलेले हृदय असे अर्भक जन्माला आलेले नाही.

(४) सदर शहरातील प्रदुषणावर नियंत्रण आणण्यासाठी कृती योजनेचा आराखडा तयार करण्याचे काम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यास्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र नाशिक व अहमदनगर येथे सुरु करण्याबाबत

**(१३) * ३७९८० डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३३०७३ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत संलग्न महाविद्यालय आणि संस्थांची मोठी संख्या विचारात घेता प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रशासकीय यंत्रणेवर कामकाजाचा मोठा ताण निर्माण झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुषंगाने नाशिक व अहमदनगर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयासंदर्भात राज्यातील अकृषी विद्यापीठांतर्गत उपकेंद्र निर्मितीसंदर्भात एक समान धोरण निश्चित करण्यासाठी दिनांक २८ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार स्थापन केलेल्या डॉ.योगानंद काळे समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशींमध्ये प्रामुख्याने स्थानिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, संशोधनात्मक विस्तारित सेवा, प्रशासकीय प्रमाणता उपकेंद्रासाठी पायाभुत सुविधांचा विकास, आर्थिक स्त्रोतांचे नियोजन, पद रचना इत्यादी बाबींसंदर्भात शासनास शिफारशी सादर केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्रांचे सक्षमीकरण करून स्वायत्त नाशिक कॅम्पस सुरु करण्याकरीता मान्यता देवूनही माहे जानेवारी, २०१८ पर्यंत सदर नाशिक कॅम्पस सुरु करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत समितीने केलेल्या शिफारशींची व्यवहार्यता तपासून अकृषी विद्यापीठांतर्गत उपकेंद्र स्थापनेबाबतच्या विचाराधीन बाबींबर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र नाशिक व अहमदनगर येथे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू निर्णय केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) प्रा.योगानंद काळे समितीने केलेल्या शिफारशी तसेच अकृषी विद्यापीठांतर्गत उपकेंद्र स्थापन केल्यामुळे शासनावर येणारा आर्थिक भार विचारात घेता, सद्य:स्थितीत काळे समितीने सुचविलेल्या शिफारशी स्थगित ठेवण्यात आल्या आहेत.

(५) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता, विद्यापीठामार्फत अहमदनगर व नाशिक येथे उपकेंद्र सुरु करण्यात आलेली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी भाषा विभागांतर्गत डीजीटायझेशन करण्यात आलेले साहित्य लोकाभिमुख करण्याबाबत

**(१४) * ३८६३२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी मराठी भाषा विभागांतर्गत विश्वकोश व जुन्या दुर्मिळ पुस्तकांचे डीजीटायझेशन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील किती पुस्तके वाचली व डाऊनलोड केली याची माहिती विभागाकडे किंवा संस्थेकडे उपलब्ध नसून हा अतिशय दुर्मिळ व महत्वाचा साहित्य ठेवा ई-बुक स्वरुपात उपलब्ध असूनही याला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर साहित्य लोकाभिमुख करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संकेत स्थळासंबंधिच्या तांत्रिक अडचणींमुळे संकेतस्थळावरील वाचकांच्या भेटीची नोंद उपलब्ध नाही हे खरे आहे, परंतू ही माहिती वाचकांकरीता मोफत उपलब्ध असल्याने वाचकांनी याचा लाभ घेतला आहे, हे वाचकांनी वेळोवेळी विभागाला कळविले आहे.

(३) सदर साहित्य लोकाभिमुख करण्यासाठी विविध माध्यमातून वेळोवेळी प्रसिध्दी देण्यात आली आहे. तसेच शासनाची संकेतस्थळे अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत

**(१५) * ३७९१६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३१२६७ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने केंद्र शासनाकडे केंव्हा पाठविला होता त्यानंतर सदर प्रस्तावाला शासनाने मान्यता मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय,

(२) असल्यास, एखादया भाषेला राजभाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाने काय निकष निश्चित केले आहेत,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या राजभाषा विभागाने सन १९७७ व सन २००९ मध्ये जाहीर केलेल्या परिपत्रकानुसार केंद्र शासनाच्या विविध सार्वजनिक क्षेत्रातील बँका, दूरध्वनी, टपाल खाते, रेल्वे, मेट्रो, विमानसेवा व मोनोरेल आदि कार्यालयामध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात शासनाने काय प्रयत्न केले आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीने तयार केलेला विहीत प्रस्ताव दिनांक १६/११/२०१३ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाकडे पाठविला आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

(२) राजभाषा दर्जा देणे व अभिजात भाषेचा दर्जा देणे या दोन्ही बाबी भिन्न आहेत. राजभाषा दर्जा देण्याची तरतूद संविधानामध्ये आहे. तर अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने पुढील निकष निश्चित केले आहेत.

अ) १५००-२००० वर्षापर्यंतची अगदी सुरूवातीच्या ग्रंथांची/ अभिलिखित इतिहासाची अति प्राचिनता,

ब) भाषिकांच्या पिढ्यांनी एक मौल्यवान वारसा म्हणून मानलेले प्राचीन साहित्य / ग्रंथाचा भाग,

क) साहित्यिक परंपरा मूळ असावी आणि ती अन्य भाषिक समाजाकडून उसनवारी केलेली नसावी,

ड) अभिजात भाषा व साहित्य हे अर्वाचीन साहित्यापेक्षा भिन्न असल्यामुळे अभिजात भाषा आणि नंतरची रूपे किंवा तिच्या उप भाषा यामध्ये खंड देखील असू शकेल,

(३) केंद्र शासनाच्या त्रिभाषा सुत्रानुसार केंद्र शासनाने दिनांक ०१/०७/२०१० च्या ज्ञापनान्वये राज्यातील केंद्र शासनाच्या अधिपत्त्याखालील कार्यालये, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, दूरध्वनी इ. कार्यालयामध्ये हिंदी व इंग्रजी भाषेसोबत स्थानिक भाषेचा वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्र शासनाने दिलेल्या या सूचनांचे पालन करण्याबाबत राज्य शासनाने देखील राज्यातील संबंधित कार्यालयांना वेळोवळी सूचित केले आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनाकडून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

---

## महाड औद्योगिक क्षेत्रातील मल्लक स्पेशालिटी कारखान्यावर कारवाई करण्याबाबत

**(१६) * ३८५५६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील महाड औद्योगिक क्षेत्रातील रंगद्रव्ये तयार करणाऱ्या मल्लक स्पेशालिटी कारखान्यामधून निळा धूर शेजारच्या जिते गावात बाहेर पडत असल्याची तक्रार एमआयडीसी पोलीस स्थानकात माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकारच्या निळ्या धुरामुळे जिते गावातील वाहने, घरांच्या भिंती, खिडक्या या निळ्या झाल्या असून येथील नागरिकांना श्वसनाचा त्रास होत असल्याची तक्रारही ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून पर्यावरण विभाग तसेच स्थानिक पोलीस स्थानकामधील अधिकाऱ्यांनी उक्त प्रदुषणकारी कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) व (२) मे.मल्लक स्पेशालिटी प्रा.लि. या कारखान्यामधून निळ्या रंगाचे धूलीकण बाहेर पडत असून यामुळे जिते गावातील नागरिकांना श्वसनाचा त्रास होत असल्याबाबतची तक्रार एमआयडीसी पोलीस स्थानक, महाड यांच्याकडून दुरध्वनीद्वारे उपप्रादेशिक कार्यालय, महाड यांच्याकडे प्राप्त झाली हे खरे आहे.

(३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे.मल्लक स्पेशालिटी प्रा.लि. या कारखान्यास स्वत: उत्पादन बंद करण्याचे (Voluntary Closure) चे निर्देश बजाविण्यात आले होते. तथापि, सदर उद्योगाने निर्देशांचे पालन न केल्याने पुन्हा उत्पादन बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत बजावण्यात आले होते. त्यानुसार सदर उद्योगाने त्यांची उत्पादन प्रक्रिया दिनांक १९/०२/२०१८ रोजी सायंकाळी ४ वाजेपासुन ते २२/०२/२०१८ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत बंद ठेवली होती.

दरम्यान सदर उद्योगाने इथीलीन ऑक्साइड प्लान्टला सतत थंड (चीलींग) स्थितीत ठेवावे लागत असल्यामुळे पाणीपुरवठा पुन्हा सुरु करण्यात यावा, अन्यथा स्फोट होऊन मोठी दुर्घटना होऊ शकते. तसेच उद्योगाने हवा प्रदुषण नियंत्रण सयंत्रणेत आवश्यक ती सुधारणा केली असल्याने उत्पादन पुन्हा सुरू करण्याची विनंती दिनांक १९/०२/२०१८ व दिनांक २०/२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली होती. त्यानुसार सदर उद्योगास बजावण्यात आलेल्या उत्पादन बंदीच्या निर्देशास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २२/०२/२०१८ रोजी तात्पुरती स्थगिती दिली असून दंडात्मक कारवाई म्हणून बँक गॅरंटी जप्त केली आहे.

---

## नंदुरबार तालुका क्रीडा संकुलाचे काम सुरु करण्याबाबत

**(१७) * ३८५०९ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३२९७३ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार तालुका क्रीडा संकुलाच्या भुमिपुजनाच्या कामास ५ ते ६ वर्षे पूर्ण होऊनही क्रीडा संकुलाच्या कामास सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदुरबार तालुका क्रीडा संकुलाचे काम किती दिवसात सुरु करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नंदुरबार तालुका क्रीडा संकुलाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नंदुरबार तालुका क्रीडा संकुल उभारणीसाठी आदिवासी देवमोगरा एज्युकेशन सोसायटी, नटावद, ता.जि.नंदुरबार संस्थेची जागा संकुल समिती व संस्था यांच्यात करार करुन प्राप्त करण्याची कार्यवाही चालु होती. परंतू सदर संस्थेने दिनांक २८/०९/२०१७ च्या पत्रान्वये करार रद्द करण्याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, नंदुरबार कार्यालयास कळविले आहे. त्यामुळे संकुलाच्या बांधकामाबाबत दिनांक १४/०२/२०१८ रोजी तालुका क्रीडा संकुल समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. सदर बैठकीत तालुका क्रीडा संकुल समिती, नंदुरबार कडे यापूर्वी असलेल्या शहरातील स.क्र.४२६/अ/१अ या जागेवर इनडोअर हॉल, कार्यालय इमारत व विविध खेळाची मैदाने तयार करणे तसेच अतिक्रमण असलेल्या जागेवर गाळे उभारणी करुन गाळयांच्या मागील बाजूस प्रेक्षागृह तयार करणेबाबतचा निर्णय होऊन सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांचेमार्फत अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन समितीच्या मान्यतेने संकुलाचे बांधकाम करण्याचे ठरले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीपासून शाळा-शाळांमध्ये लेक वाचवा, लेक शिकवा अभियान राबविण्याबाबत

**(१८) * ३८९९९ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, प्रा.डॉ.तानाजी सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी ३ ते २६ जानेवारी या कालावधीत "लेक शिकवा" अभियान व विविध उपक्रम राबविण्यात येतात, तसेच या उपक्रमांतर्गत माजी विद्यार्थीनींचे सत्कार, शाळाबाह्य मुलींना शाळेत आणण्यासाठी प्रयत्न करुन मुलींना शिकण्यासाठी प्रोत्साहन मिळेल अशा स्पर्धा व्याख्याने यांचे आयोजन केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०४ जानेवारी, २०१८ रोजी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात यावे अशी सूचना शिक्षण विभागाने शाळांना केली असून सदर शैक्षणिक साहित्य लोकसहभागातूनच शिक्षकांनी मिळवावे यासाठी शिक्षकांना गावातील ग्रामपंचायत, बँका, पतसंस्था आणि गावातील दानशुर नागरिकांकडून शालेय गरजेच्या वस्तू मुला-मुलींना वाटण्यासाठी मिळवाव्यात असे आदेश शिक्षण विभागाने नुकत्याच काढलेल्या पत्रातून शाळांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांच्या अतिरिक्त कामात दानशूर व्यक्ती शोधण्याच्या कामाचाही समावेश झाला असून शाळेतील वर्ग डिजीटल करण्यासाठी देणगी मिळवा, शाळेत पायाभूत सुविधा उभारावयाच्या आहेत त्यासाठी निधी गोळा करा, या अभियानाचा फेरा शिक्षकांनी पूर्ण करताच पुन्हा शिक्षण विभागाने उक्त नवीन पत्र काढण्याची कारणे काय आहेत, यामुळे विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणावर परिणाम होवू शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीपासून शाळां-शाळांमध्ये लेक वाचवा, लेक शिकवा अभियान राबविण्याबाबत राज्यभरात शासनाने ४० लाख ८० हजारांचा निधी राज्यातील शाळांना दिला होता, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील शाळांनी काही कार्यक्रम वगळता कोणतचे अभियान राबविले नसल्याने याबाबत काही खाजगी संस्थांनी शासनाच्या जिल्हा परिषद विभागाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षण विभागाने दिलेले निर्देश रद्द करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) नाही.

(४) सदर निधी राज्यातील शाळांना दिलेला नसून तालुकास्तरावर कार्यक्रम आयोजनासाठी जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था यांच्यामार्फत गटशिक्षणाधिकारी यांना दिलेला आहे.

(५) नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ सुरु करण्याबाबत

**(१९) * ३७७५१ ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, श्रीमती स्मिता वाघ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शिक्षण विभागाने नव्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील दहावी आणि बारावीच्या परिक्षा घेणाऱ्या राज्य शिक्षण मंडळासोबत आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ आयसीएसई, आयजीसीएसई, आयबी सुरु करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१८ मध्ये घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परराज्यातील आणि परदेशातील शाळांनाही या मंडळाची संलग्नता देण्यात येणार असल्याने मंडळासाठी स्वतंत्र अभ्यासक्रमही तयार करण्यात येणार असून याकरिता आवश्यक असलेली तांत्रिक बाबींची पूर्तता, कर्मचाऱ्यांची नियुक्ती, अभ्यासक्रम तयार करणे, पाठयपुस्तकांची निर्मिती, संलग्नता देण्याचे निकष निश्चित करणे आदि बाबींची पूर्तता केली आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ज्या १०० निवडक शाळांना आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याची विशेष मोहिम हाती घेतली त्याशाळाही या मंडळाशी संलग्न असणार आहेत, तसेच उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी माहे जून, २०१८ पासून करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) दिनांक २ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शाळा मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) या संदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) राज्यात आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दर्जाच्या शाळा निर्माण करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ अन्वये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा निर्मितीचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये होणारे अध्ययन-अध्यापन आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे असणे आवश्यक असून, याकरिता शैक्षणिकदृष्ट्या पुरेसे स्वातंत्र्य व स्वायतत्ता मिळणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात या शाळांच्या संलग्नतेकरिता महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शाळा मंडळ असे नवीन बोर्ड

स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. या महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शाळा मंडळांतर्गत विविध समित्या स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हा विज्ञान प्रदर्शनीकरीता शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षकांकडून पैसे वसूल केल्याबाबत

**(२०) * ३८९७० श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा विज्ञान प्रदर्शनीकरीता शिक्षकांकडून पैसे वसूल करण्याचे आदेश येथील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात विदर्भ माध्यमिक शिक्षकांनी शिक्षण उपसंचालक, अमरावती यांच्याकडे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्याचे प्रदर्शनी उमरखेड येथे पार पडणार असल्यामुळे येथे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सहविचार सभा घेवून या शाळेतील शिक्षकांकडून वर्ग ५ ते १२ च्या शाळेकडून प्रत्येकी ७ हजार, वर्ग ५ ते १० यांच्याकडून ५ हजार, वर्ग ८ ते १० यांच्याकडून ३ हजार वसुली करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विज्ञान प्रदर्शनीकरीता अशा प्रकारची वसुली करणे योग्य नसल्याने संबधित शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील विद्यार्थी अल्पसंख्याक प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याबाबत

**(२१) * ३९२०९ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात अनेक विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये अल्पसंख्याक प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्तीपासून विद्यार्थी वंचित असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्याक प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्तीकरीता सन २०१७-१८ साठी आतापर्यंत हिंगोली जिल्ह्यातून नवीन व नूतनीकरण विद्यार्थ्यांचे एकूण २१९१० अर्ज प्राप्त झाले होते. त्यामधून पडताळणी झालेले एकूण अर्ज २०३८७ असून त्यापैकी एकूण १२३३८ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शिष्यवृत्ती जमा झाली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपाचे काम सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घोन्सा (ता.वणी, जि.यवतमाळ) येथून विदर्भ नदीपात्रात कुंभारखणी कोळसा खाणीतून दूषित पाणी सोडल्याबाबत

**(२२) * ३८२७८ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोन्सा (ता.वणी, जि.यवतमाळ) येथून बारमाही वाहणाऱ्या विदर्भ नदीपात्रात कुंभारखणी भूमिगत कोळसा खाणीतून दूषित पाणी सोडले जात असल्याने नदीपात्रातील पाणी काळेभोर व दूषित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विदर्भ नदीपात्रातील प्रदुषण रोखण्याबाबत कार्यवाही करुन कुंभारखणी भूमिगत कोळसा खाणीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) सदर खाण परिसराची दिनांक २९/१०/२०१७ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात आली आहे. सदर पाहणीदरम्यान खाणीतून निघणाऱ्या पाण्याचा नाल्यात विसर्ग आढळून आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षांची नेमणूक करण्याबाबत

**(२३) * ३८६६७ श्री.जयंत पाटील, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उद्योजक, व्यापारी यांच्यासह अन्य व्यवहारामध्ये फसवणूक झालेल्या नागरीकांना न्याय मागण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाचे भंडारा जिल्ह्यातील अध्यक्षपद मागील ६ महिन्यांपासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील ग्राहकांच्या तक्रार निवारणाची अनेक प्रकरणे निर्णयासाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षांची नेमणूक न करण्याची कारणे काय आहेत व त्याच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, तसेच कार्यवाही पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री.गिरीश बापट :** (१) खरे आहे.

तथापि, जिल्हामंच, भंडारा येथे रिक्त असलेल्या अध्यक्ष पदावर दिनांक ०५/०२/२०१८ च्या शासन निर्णयाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर मंचामध्ये आजमितीस ३२९ प्रकरणे निर्णयासाठी प्रलंबित आहेत.

(३) सर्व जिल्हामंचामध्ये अध्यक्ष यांची रिक्त पदे भरण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये जाहिरात दिली होती. त्यानुसार संबंधित उमेदवारांची वरील पदासाठी लेखी परीक्षा व त्यानुषंगाने मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी जाहिर करुन त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यास वेळ लागल्यामुळे अध्यक्षांची नियुक्ती त्या त्या मंचामध्ये करणे शक्य झाले नाही. आता सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन संबंधित जिल्हा मंचामध्ये रिक्त असलेल्या अध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

---

## सदाशिव पेठ (पुणे) येथे पेशवेकालीन नाणी सापडल्याबाबत

**(२४) * ३७८४८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सदाशिव पेठेतील पेरुगेट पोलीस चौकीजवळच्या नदीपात्राच्या परिसरात तसेच शहरात बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी असलेल्या वाळूमध्ये माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पेशवेकालीन नाणी सापडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाण्यांवर छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्यामध्ये चलन म्हणून सुरु केलेल्या "शिवराई" नाण्यांचे अस्तित्व आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार नाणी सापडलेला परिसर जतन करुन ठेवण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर, २०१७ रोजी संध्याकाळच्या सुमारास सदाशिव पेठेतील पेरूगेट पोलीस चौकीजवळ श्री.विशाल खुळे यांना पेशवेकालीन शिवराईचे १ नाणे सापडल्याचे वृत्त दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक ०२/०१/२०१८ रोजी प्रसिध्द झाले आहे. सदर नाणे रस्त्याचे काम सुरु असलेल्या ठिकाणी मातीत आढळले असून नदीपात्राच्या परिसरात ते सापडले नाही.

(२) होय.

(३) पेरुगेट पोलीस चौकीजवळ सदाशिव पेठ या ठिकाणी एकच नाणे श्री.विशाल खुळे या व्यक्तीस सापडले असून ते नाणे त्यांनी नाणे अभ्यासक श्री.राजू मेमाणे यांच्याकडे संशोधनासाठी दिले आहे. सहायक संचालक, पुणे कार्यालयाने नाणे संशोधकाशी भ्रमणध्वनीवरुन प्रत्यक्ष संपर्क साधला असता त्यांनी सदर नाणे पुरातत्व विभागाकडे सुपूर्द करण्यास असहमती दर्शविली. सदरहू नाणे हे पाण्याच्या प्रवाहात वाहून आले असावे व वाळू वाहतूकीमध्ये ते नाणे सदरहू ठिकाणी आले असावे असा प्राथमिक अंदाज असल्याने नाणे सापडल्याचा परिसर जतन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अन्न भेसळ रोखण्याकरिता कायद्यात सुधारणा करण्याबाबत

**(२५) * ३८३२७ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न भेसळ रोखण्यासाठी असलेले केंद्राचे कायदे व राज्याची नियमावली यांना मर्यादा आणण्याकरिता कायदा करण्याचे मत मा.अन्न व औषधे प्रशासन मंत्री यांनी व्यक्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायद्यातील तांत्रिक बाबींचा गैरवापर करुन कायद्याच्या आधारे अन्नात भेसळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अन्नातील भेसळ रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) देशात अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ हा नवीन कायदा, दिनांक ०५/०८/२०११ पासून लागू झाला असून त्यामध्ये शिक्षेच्या व दंडाच्या तरतूदी आहेत. तसेच काही ठराविक गुन्ह्यामधील भेसळ रोखण्यासाठी जास्त तरतूद असावी, यासाठी सदर कायद्यातील नमूद शिक्षा वाढविण्याच्यादृष्टीने सुधारणा व सूचनांचा प्रस्ताव सादर केला आहे. केंद्र सरकारचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे व्यापक पुनर्विलोकन घेण्याबाबत समिती स्थापन केली होती. सदर समितीपुढे अन्न सुरक्षा कायद्यात सुधारणा करण्यासाठी प्रशासनाने सुधारणा व सूचनांचा प्रस्ताव सदर समितीला पाठविलेला आहे.

(४) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

## शिक्षण सेवकास कायमस्वरुपी सेवेमध्ये सामावून घेण्याबाबत

**(२६) * ३८६६४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९ पासून शिक्षण सेवक म्हणून काम करु इच्छिणाऱ्या पदवीधर युवकास ठाणे जिल्हा परिषदेमार्फत ३ वर्ष कालावधीकरिता नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक सेवक म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षक सेवकास पटपडताळणी प्रक्रियेनंतर त्यांचा ३ वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची सेवा खंडीत करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक सेवक म्हणून आदेश दिलेल्या उमेदवारास कायमस्वरुपी शासकीय सेवेत घेण्याबाबत शिक्षक सेवकांनी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना त्याच सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हाफकीन इन्स्टिट्यूट फार्मा कंपनी म्हणून चालविण्याबाबत

**(२७) * ३७७४६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिओ लस निर्मितीच्याबाबतीत जागतिकस्तरावर अग्रेसर असलेली हाफकीन इन्स्टिट्यूट ही संस्था फार्मा कंपनी म्हणून सुरु करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था (हाफकिन इन्स्टिट्यूट) ही संशोधन कार्यामध्ये अग्रेसर संस्था असून सदर संस्था ही फार्मा कंपनी म्हणून सुरु करण्याचा कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही. हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ (मर्यादीत) या शासन अंगिकृत कंपनीची कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत सन १९७५ मध्ये स्थापना करण्यात आली असून स्थापनेपासूनच सदर महामंडळाकडून विविध औषधे, लसी, प्रतिजैविके इत्यादी औषधांची निर्मिती करण्यात येते. महामंडळातील औषधी-गोळ्या व कॅप्सुल या विभागाचे संपूर्ण नूतनीकरण अंतिम टप्प्यात असून नजिकच्या काळात तेथून ९ ते १२ विविध औषधांच्या (फार्मास्युटीकल्स फॉरम्युलेशनस्) निर्मितीस सुरुवात होईल.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरात स्कुल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्कीटेक्चर सुरु करण्याबाबत

**(२८) * ३८५६१ श्री.सुभाष झांबड : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक २२१४७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे स्कुल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर सुरु करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी करुन तीन वर्षाचा कालावधी होवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.मुख्यमंत्री यांनी घोषणा केल्यानुसार स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर औरंगाबाद येथे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

(२) राज्यातील औरंगाबाद शहरात स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर सुरू करावी याबाबत केंद्र शासनाकडून मान्यता मिळण्याकरिता मा.मंत्री (मानव संसाधन), भारत सरकार यांना मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्यास्तरावर दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने, मा.मंत्री (मानव संसाधन विकास), भारत सरकार यांनी दिनांक १६/०५/२०१६ च्या पत्रान्वये स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर, नवी दिल्ली या देशातील नामांकित संस्थेस नागरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या समवेत संयुक्तपणे मुल्यांकन करुन राष्ट्रीय/राज्यीय स्तरावर स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर स्थापनेबाबत अहवाल सादर करण्याबाबत व सदरचा अहवाल मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांना प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनास स्मरण करण्यात यावे यासाठी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्तरावर दिनांक ०८ सप्टेंबर, २०१५ आणि अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्तरावर, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ व दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी अर्धशासकीय पत्र पाठविण्यात आलेले आहे. तथापि, अद्यापपर्यंत केंद्र शासनाकडून सदर संस्थेच्या स्थापनेस मान्यता मिळालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात धुरमुक्त भट्ट्या उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२९) * ३८२२६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी झोपडपट्टी येथे संकल्प सिद्धी ट्रस्टने धुरमुक्त भट्ट्यांचा प्रयोग यशस्वी करुन दाखविला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत विविध झोपडपट्टी व निवासी परिसरात असलेल्या विविध प्रकारच्या भट्ट्यांच्या प्रदुषणांमुळे स्थानिक रहिवाश्यांना दमा, डोळ्यांचे विकार, त्वचारोग अशा आजाराच्या समस्या निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याकरिता अन्य राज्यात उपलब्ध असलेल्या धूरमुक्त भट्ट्या आपल्या राज्यात उपलब्ध करण्याबाबत तसेच त्या स्थापित करणाऱ्या व्यावसायिकांसाठी अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) मुंबईतील धारावी झोपडपट्टी येथे धुरमुक्त भट्ट्याचा प्रयोग संकल्प सिध्दी ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात आला, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खटाव (ता.पलूस, जि.सांगली) पाण्याच्या टाकीची कामे निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३०) * ३८५८१ श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव (ता.पलूस, जि.सांगली) येथे गावाच्या पाणीपुरवठा योजनेची जीर्ण झालेली पाण्याची टाकी पाडत असताना प्रशासन व ठेकेदारांने दक्षता न घेतल्यामुळे ती नव्याने बांधलेल्या टाकीवर कोसळून दोन्ही टाक्या जमीनदोस्त झाल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे राष्ट्रीय पेयजल योजनेचे सुमारे ५४ लाखाचे नुकसान होऊन त्यामध्ये एक व्यक्ती जखमी झाला त्यावेळी येथे एकही शासकीय कर्मचारी हजर नव्हता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा व ठेकेदारांच्या चुकीमुळे सदर घटना घडली असल्याने संबंधित कंत्राटादारांवर कारवाई करुन घटनेतील बाधित घराची नुकसान भरपाई व जखमी व्यक्तीला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

मौजे खटाव ता.पलूस येथील जुनी पिण्याच्या पाण्याची टाकी संबंधित कंत्राटदार हे चुकीचे पध्दतीने पाडत असतांना ती नव्याने बांधलेल्या टाकीवर पडल्याने नविन पिण्याच्या पाण्याची टाकी पडली असून त्यामध्ये कोणीही जखमी झालेले नाही.

जुनी पाण्याची टाकी पाडण्याचे काम संबंधित कंत्राटदाराने ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांना कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना न देता विनापरवाना परस्पर काम सुरु केले होते. ज्या दिवशी टाकी पडली त्या दिवशी शासकीय सुट्टी होती.

पडलेल्या नविन उंच साठवण टाकीचे देयक अद्यापपर्यंत कंत्राटदाराला अदा करण्यात आलेले नाही त्यामुळे शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

कंत्राटदार चुकीच्या पध्दतीने जुनी टाकी पाडत असतांना नवीन टाकी पडल्याने ती स्वखर्चाने नवीन टाकी बांधून देणेसंबंधिचे तसेच बाधित झालेल्या घराच्या दुरुस्तीबाबत कंत्राटदाराने शपथपत्र दिले आहे.

नव्याने बांधणेत येणाऱ्या उंच साठवण टाकीसाठी पडलेल्या टाकीचा पाया जमिनीखाली असल्याने अन्यत्र नविन उंच साठवण टाकी बांधण्यासाठी आवश्यक जागा ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन दिली असून सदर ठिकाणी कंत्राटदाराने दिनांक २१/०२/२०१८ पासून काम सुरु केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तासगावकर अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालय (ता.कर्जत, जि.रायगड) येथील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत

**(३१) * ३८५९८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरस्वती शिक्षण संस्थेच्या तासगावकर अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालय (ता.कर्जत, जि.रायगड) येथील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे १५ महिन्यापासून वेतन प्रलंबित असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेने कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरली नसल्याने भविष्य निर्वाह निधी आयुक्तांनी गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन व भविष्य निर्वाह निधीची रक्कम सदरील महाविद्यालयाकडून मिळवून देण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) कोणत्याही अभियांत्रिकी महाविद्यालयाविरोधात कारवाई करण्याचे सर्वाधिकार केंद्र शासनाच्या अधिपत्त्याखालील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेस आहेत. सदर प्रकरणी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ करीता प्रसिध्द करण्यात आलेल्या Approval Process Handbook नुसार विहित करण्यात आलेल्या निकषांचे उल्लंघन झाले आहे. यास्तव, संबंधित संस्थेविरुध्द कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगीत नाटय स्पर्धेचे केंद्र रत्नागिरी येथे कार्यान्वित करण्याबाबत

**(३२) * ३८०७४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगीत नाट्य स्पर्धेचे केंद्र हे नियमानुसार रत्नागिरी जिल्ह्यात असताना ते अचानक कोल्हापूरला स्थलांतर केल्याच्या निषेधार्थ संगीत नाटयकर्मी व हौशी रंगकर्मी यांनी एकला चलो या वृत्तीने लढा देऊन रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ निषेध, आंदोलन केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नाटय स्पर्धेचे केंद्र रत्नागिरीला जाहिर करावे अन्यथा उपोषण करु अशी मागणी हौशी रंगकर्मी अविनाश काळे यांनी मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संगीत नाट्य स्पर्धेचे केंद्र रत्नागिरी येथे कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) संगीत नाट्य स्पर्धेचे केंद्र रत्नागिरीलाच असावे, असा कोणताही नियम नाही. तथापि, तेथेच स्पर्धा केंद्र असावे, अशी मागणी करण्यात आली होती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिप्परगा थडी (ता.बिलोली, जि.नांदेड) गावात पाणी टंचाई झाल्याबाबत

**(३३) * ३८५१६ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिप्परगा थडी (ता.बिलोली, जि.नांदेड) गावात मन्याड नदीजवळ असतानाही येथील ग्रामस्थांवर पाणीटंचाईमुळे पाणी विकत घेण्याची वेळ आल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावात असलेल्या ४ हातपंपापैकी २ हातपंप नादुरुस्त असून पाणी साठवून ठेवण्यासाठी पाण्याची टाकी नसल्यामुळे ग्रामस्थांची पाण्यासाठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिप्परगा थडी येथील हातपंप दुरुस्त करुन येथे पाण्याची साठवण करण्याकरिता टाकी बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

हिप्परगा थडी, ता.बिलोली या गावात एकुण ५ हातपंप व ६ विद्युतपंप आहेत. ५ हातपंपापैकी २ हातपंप सुरु असून नादुरुस्त २ हातपंप सुध्दा दुरुस्त करण्यात आल्याने एकुण ४ हातपंप सुरु आहेत व १ हातपंपास पाणी उपलब्ध नसल्याने बंद आहे. तसेच ५ विद्युत पंप सद्य:स्थितीत सुरु आहेत असे एकंदर ४ हातपंप व ५ विद्युतपंपाद्वारे गावास पाणीपुरवठा सुरु आहे.

(३) सदरील गावात जुनी नळ पाणीपुरवठा योजना असून जुन्या योजनेची दगडी टाकी (जीएसआर) अस्तित्वात आहे. सद्य:स्थितीत सदरील दगडी टाकीला गळती असल्याने नवीन पाणीपुरवठा योजना (आरसीसी टाकी) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा-२ मध्ये प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉक्टरांनी प्रिस्क्रिप्शनमध्ये लिहून दिलेले प्रमाण/मात्रेनुसार रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) * ३८३८५ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉक्टरांनी प्रिस्क्रिप्शनमध्ये लिहून दिल्याप्रमाणे गोळ्या संबंधित रुग्णाला देण्याबाबतचे शासनाने जाहीर केलेले परिपत्रक प्रत्येक औषध विक्रेत्यांनी दुकानात लावणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही रुग्णांना ४ किंवा ६ गोळ्यांचे प्रिस्क्रिप्शन दिलेले असताना राज्यातील अनेक औषध विक्रेते १० ते २० गोळ्या असलेले पाकीट देतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णांची होत असलेली फसवणूक रोखण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषी औषध विक्रेत्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

अशा तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. याबाबत प्रशासनाने वेळोवेळी परिपत्रक काढून औषध विक्रेत्यांना डॉक्टरांनी लिहून दिलेल्या मात्रेनुसारच औषधांची स्ट्रीप कापून औषध विक्री करावी अशा सूचना निर्गमित केल्या आहेत.

(३) उक्त सूचनांचे अनुपालन न केल्याचे आढळून आल्यास संबंधित औषध विक्रेत्यांची तपासणी करुन परवाने निलंबित वा रद्द करण्याची कार्यवाही प्रशासनाकडून घेण्यात येते.

मागील ५ वर्षात स्ट्रीप कट करुन प्रिस्क्रिप्शनवरील औषधांची मात्रा विक्री करीत नसल्याचे एकूण २३ प्रकरणे आढळून आली असून त्यांचेवर परवाने निलंबन/रद्दची कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील माईस एमआयटी शाळेने केलेल्या शुल्कवाढ व शालेय वेळेतील बदल रद्द करण्याबाबत

**(३५) * ३८७८९ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील माईस एमआयटी शाळेने अन्यायकारक केलेल्या शुल्कवाढी व शालेय वेळेत केलेल्या बदलांच्या विरोधात शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार माईस एमआयटी शाळेने अन्यायकारक केलेली शुल्कवाढ व शालेय वेळेतील बदल रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) माईस एमआयटी शाळेने शालेय वेळात बदल केले असल्याने पालकांनी आंदोलन केले होते.

शालेय वेळ बदलाबाबत शाळेतील सर्व पालकांचे पारदर्शी पध्दतीने मतदान घेवून मतदानाच्या निर्णयानुसार पूर्वीची वेळ कायम करणेबाबत शाळा प्रशासनास आदेशीत करण्यात आले आहे. त्यानुसार शाळा प्रशासनाने शाळेच्या वेळेत बदल करुन पूर्ववत वेळेनुसार शाळा भरविण्याची कार्यवाही केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील पाणी टंचाई निवारणाची कामे सुरु करण्याबाबत

**(३६) * ३८१२७ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील ५३४ गावांमध्ये पाणीटंचाई निवारणासाठी १ हजार ८४ उपाययोजनांच्या कामांकरिता २६ कोटी ८५ लाख रुपयांच्या कृती आराखडयास मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृती आराखड्यात अकोला जिल्ह्यातील कोणकोणत्या गावांचा समावेश करण्यात आला आहे, तसेच कृती आराखड्यास मंजूरी मिळूनही अद्यापी संबंधित यंत्रणेकडून कामांचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आले नसल्याने कृती आराखड्यात समाविष्ट कामे सुरु करण्यास अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृती आराखड्यातील कामे सुरु न झाल्याने जिल्ह्यातील विविध भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना पाण्याकरिता पायपीट करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृती आराखडयातील प्रलंबित पाणीटंचाई निवारणाची कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) सन २०१७-१८ च्या मंजूर कृती आराखड्यामध्ये समावेश असलेल्या जिल्हयातील संभाव्य टंचाई कृती आराखडयात नमूद गावे/ वाडयांची यादी खालील प्रमाणे आहे.

**<u>ता.अकोला</u>** :- आगर, नवथळ, खेकडी, परीतवाडा, पाळोदी, गोत्रा, कंचनपुर, सांगवी खु, सांगवी बु, फरमदाबाद, वल्लभनगर, निराठ, वैराग, गोपालखेड, गांधीग्राम, निंभोरा, हिंगणातामसवाडी, धामणा, कासली खु, कासली बु, म्हैसांग, रामगाव, राजापुर, गोंदापुर, मजलापुर, जलालाबाद, बहिरखेड, घुसर, अलियाबाद, आपातापा, आपोती खु, कौलखेड गो., गोणापूर, आपोती बु, खोबरखेड, मारोडी, लाखोंडा बु, लाखोंडा खु, घुसरवाडी, एकलारा, अंबिकापूर, दापुरा, म्हातोंडी, बादलापूर, सांगळूद बु, धोतरडी, वरोडी, सांगळूद खु, आखतवाडा, नावखेड सुलतान अज., शामाबाद, अनकवाडी, वाकी, बोरगाव म., निपाणा, पळसो खु. कौलखेड जहा., बहादरपुर, दहीगाव, शिवणी, सुकळीनंदापूर, मुजरे मोह., दोनवाडा, चांदूर, सुकळी तलाव, खांबोराप्रादेशिक, सांगवी मोहाडी, माझोडी, डाबकी जहा., कुरणखेड, चिखलगाव, गोरेगाव खु, बोरगाव खु, कट्यार, काटी, पाठी, खडका, मिर्झापूर (अन्वी), मोरगाव भा., खडकी टा., वणी, मासा, सिसा, कापशी तलाव, सिसा बोंदरखेड, अमानतपुर, तामशी, लाखणवाडा, रोहणा, वडद खु, सुकोडा, कानडी, कुभांरी, वडद बु, उगवा, कोठारी, कोळंबी, दाळंबी, मिर्झापूर, सोनाळा, दुधलम, भाकराबाद, कपिलेश्वर, पातुर नं., वाळकी, ढगा, जवळा दो., टाकळी पोटे, देवळी, पैलपाडा, गोरेगाव बु, बाभूळगाव जहा. वाशिंबा, खांबोरा, सांगेफळ, बिरसींगपुर, हिंगणा जहा, दुधाळा, मंडाळा, वणी रंभापूर, वणी राजापूर, म्हैसपूर, कळम्बेंश्वर, निंबी मालोकार, खरप खु, येळवण, तानखेड.

**<u>ता.बार्शिटाकळी</u>** :- पुनोती बु, पुनोती खु, लोहगढ, पिंपळगांव हांडे, महान, धाकली, एरंडा, परंडा, राहीत, जांभरुन, हलदोली, पिंजर, कोथळी बु, मो-हळ, साहीत, चेलका निंबी, धाबा, कासारखेड, चिंचखेड बु, दोनद खु, साखरविरा, किनखेड, धानारा, पळखटा, पैसाळी, वरखेड, पार्डी, मोझरी बु, सायखेड, धामनदरी, चोहोगाव, काजळेश्वर, वाघा, वस्तापूर (नवीन वस्ती), कासमार, तिवसा, चिंचखेड, जांब वसु (मुंगसाजी नगर), महागाव, आळंदा (झोपडपट्टी),

रुस्तमाबाद, निहीदा लखमापूर, राजंदा, टेंभी, खेर्डा बु., खेर्डा खु., खोपडी, टिटवा, खडकी, मांडोली, निंबी बु, वडगाव, सोनगीरी, भेडीमहाल, सिंदखेड, पाराभवानी, जनूना, सारकिन्ही, महागाव मारखेड, भेडगाव, अजनी खु, वाघजाळी, चिंचोली रुद्रा, राजनखेड, कोथळी खु, मिर्झापूर, शहापूर, मांगूळ, टिटवन, वरखेड, देवदरी, सराव, साल्पी, वाल्पी, टाकळी छ., खांबोरा, पि. चांभारे, झोडगा, हातोला, उजळेश्वर, कातखेड, जमकेश्वर, सावरखेड, निंबी खु, पाटखेड, शेलु बु., शेलु खु, कान्हेरी सरप, दोनद बु, विझोरा, बोरमळी शेलगाव, सुकळी.

**<u>ता.बाळापूर</u>** :- वाडेगाव, टाकळी खोजबेल, सावरपाटी, निंबा, काझीखेड, स्वरुपखेड, मोखा, जानोरी मेळ, ककन्हेरी गवळी, पारस, उरळ खु, झूरळ बु., झूरळ खु, जोगलखेड, अडोशी, धानोरा, सोनगिरी, बारलिंगा, धनेगाव,व्याळा, पिंपळगाव, धाडी, तांदळी, शेळद, भिकुंडखेड, निंबी, खिरपुरी खु, खामखेड, मोरगाव सदीजन, हसनापूर, कडोशी, खंडाळा, उरळ बु, चिंचोली गणु, बल्हाडी, नांदखेड, टाकळी कु., मोरझडी, अंत्री मलकापूर, कळंबा बु, कोळासा, कुपटा, मांडवा बु, सातरगाव, गायगाव, निमकर्दा, कवठा, लोहारा, बटवाडी बु., नागद, दगळखेड,सागद, हातरुन, टाकळी निमकर्दा, मनाली, बोराळा, बोरवाकळी, मनारखेड, बोरगाव वैराळं, सोनाळा, मांजरी, नकाशी, भरतपूर, सांगवी जोम, खिरपुरी बु, कसुरा, कळंबी महा., कळंबी खु, रिधोरा, दधम, बटवाडी खु, देगाव, मानकी, मांडिली, वझेगाव, हाता, डोंगरगाव, बहादुरा, मालवाडा, कारंजा रमजानपुर, अंदुरा, नया अंदुरा, तामशी, शिंगोली, हिंगणा शेळद, हिंगणा निंबा.

**<u>ता.पातुर</u>** :- शिरपूर, उमरा, पांगरा, आस्टूल, वहाहा बु, कार्ला, बेलुरा खु., कोठारी खु., विवरा, पिंपळखुट्टा, चान्नी, चतारी, खापरखेड, आगिनखेड, पार्डी, बेलुरा बु, राहेर, तुलंगा बु., नवेगाव, उमरवाडी, भंडारज बु, पहाडसिंगी, कोसगाव, तांदळी बु, खेट्री, सांगोळा, नांदखेड, दादुलगाव, तांदळी खु., देऊळगाव, बाभुळगाव, बाभळी, जांभरुण, भंडारज खु., माळराजुरा, वसाली, अंधार सांगवी गावंडगाव, शिर्ला, अंबाशी, चरणगाव, शेकापूर, रामनगर, खानापूर, दिग्रस बु.

**<u>ता.मुर्तिजापूर</u>** :- लाखपुरी, सांगवा मेळ, मुंगशी, शेलु नजीक, लाईत, टिपटाळा, वाघजळी, कोळसरा, तागवाडा(दापुरा), शिरताळा, गुंजवाडा, दापुरा, जांभा खु., कासारखेड, नागोली, पोही, कवठा खोलापूर, दुर्गवाडा, हिवरा कोरडे, जांभा बु., रोहणा, किन्ही (धानोरा), विरहीत, पिंगळा, धोत्रा शिंदे, मोझर, कंझारा, उमरी अरब, लंघापूर, सोनेरी (मुर्ति), हातगाव.

**<u>ता.अकोट</u>** :- नेव्हरी खु, नेव्हरी बु., देवरी पारधी, ऐदलापूर, सावरा, मोहाळा, बेलूरा, जळगाव नहाटे, गुल्लरघाट, जितापूर रुपागड, मार्डी प्र खटकली, सोमठाणा, धारगड, केलपाणी १ व २, चौहट्टा बाजार, पिंप्री खु., पिंप्री जैनपूर, सावरा, रंभापूर, पारळा, पडाळी सटवाई, कोलविहीर, कोहा, कुंड, बोरी, सावरगाव, खापरवाडी बु., खापरवाडी खु., दिवठाणा, वाई, शहापूर, बोर्डी, कावसा बु., मरोडा, लामकाणी, शिवपूर.

**<u>ता.तेल्हारा</u>** :- डवला, पिवंदळ बु., माळेगाव बा., मालठाणा बु., वरुड वडनेर, उकळी बा., जाफ्रापूर, निंबोरा बु., निंभोरा खु., मनब्दा, शेरी खु., थार, वाडी अदमपूर, वडगांव रोठे, तुदगाव, वाकोडी, गाडेगाव, जस्तगाव, चित्तलवाडी, घोडेगाव, भांबेरी, अकोली रुप, सदरपूर, बोरव्हा, चंदनपुर, शेरी वडनेर, शेरी बु., टाकळी, काळेगाव, गोर्धा, बेलखेड, हिवरखेड, बादखेड, कार्ला बु., खेलदेशपांडे, नर्सिपूर, पाथर्डी, खापरखेड, खेल सटवाजी, उमरी, भिली, तुदगाव, वाकोडी, सौदळा, चिपी, ईसापुर, सदरपूर, टाकळी, तळेगाव डवला, दहिगाव, तळेगाव पातुर्डा, मनात्री बु., वरुड वडनेर, मालपुरा, धोंडा आखर, तळेगाव बु., माळेगाव बाजार, तळेगाव वडनेर, पिवंदळ बु., चिचारी, दिवानझरी, बेलखेड, रायखेड, भोकर, वरुड बु., वाडी अदमपूर.

सदर गावांमध्ये पाणी टंचाई अंतर्गत विविध उपाययोजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ अखेर पर्यंत एकूण २०८ गावांमध्ये रुपये ११२५.२५ लाख इतक्या किंमतीच्या १६२ उपाययोजनांना प्रशासकीय मंजुरी प्रदान केली आहे.

कृती आराखड्यानुसार क्षेत्रिय कार्यालयांकडून कामांचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रशासकीय मंजुरी साठी प्राप्त होत असून जिल्हाधिकाऱ्यांकडून आवश्यकतेप्रमाणे कामास प्रशासकीय मंजूरी देऊन कामे पूर्ण करण्यात येत आहेत. यामध्ये कोणतेही अडथळे निर्माण झालेले नाहीत.

(३) व (४) हे खरे नाही.

पाणी टंचाई निवारणार्थ दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ अखेरपर्यंत एकूण १२७ गावांमध्ये एकूण १२५ विविध उपाययोजना पूर्ण करण्यात आल्या असून त्याद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

तसेच एकूण ६८ गावांसाठी २७ विविध उपाययोजना प्रगतीपथावर आहेत. टंचाईची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यास्तरावरुन आवश्यक ते निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भात राष्ट्रीय पेयजल योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३७) * ३९२२८ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाकडून विदर्भात राष्ट्रीय पेयजल योजनेसाठी निधीचे अनुदान प्राप्त होवूनही आजस्थितीत ४३६६४ गांवात अजूनही पाणीटंचाई असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनेत सन २०१२-१३ मध्ये गैरव्यवहार झाल्याचे लेखापरिक्षण अहवालात निदर्शनास आले असून आक्षेपाच्या ५१ मुद्दाचा अहवाल लेखापरिक्षणाकडून शासनास पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

स्थानिक निधी लेखा परीक्षा, अमरावती यांचेद्वारा जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षण अहवालात आक्षेप क्र.५ मध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत झालेल्या खर्चासंबंधी मोजमाप पुस्तिका तथा आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्यामुळे मूळ प्रमाणकासह अभिलेख्याची तपासणी न होणे या आक्षेपांतर्गत ५१ मुद्दे नोंदविण्यात आले आहेत.

सदर आक्षेपाबाबतचा पुर्तता अहवाल जिल्हा परिषद, अमरावती यांनी सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा विभाग, अमरावती यांना सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लासलगांव-विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील मुख्य ऊर्ध्व वाहिनीचे नुतनीकरण करण्याबाबत

**(३८) * ३९३६३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव-विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील मुख्य ऊर्ध्व वाहिनीच्या नुतनीकरणाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ व दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनेची मुख्य ऊर्ध्व वाहिनी दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी फुटल्यामुळे हजारो लिटर पाणी वाया गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लासलगाव-विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य ऊर्ध्व वाहिनीच्या नुतनीकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

सदर योजनेसाठी ग्रामीण पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत, सन २०१५-१६ मध्ये रुपये २८.९६ लक्ष, सन २०१६-१७ मध्ये रुपये २१.४५ लक्ष व सन २०१७-१८ मध्ये रुपये २२.०९ लक्ष इतके प्रोत्साहन अनुदान या विभागामार्फत वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच सदर योजनेचा संकल्पन कालावधी संपलेला नसल्याने, अस्तित्वातील उर्ध्ववाहिनी न बदलता, सतत होणारी पाईप गळती थांबविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * ३९६४८ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ३६९५६ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९८ हजार २१३ शाळांपैकी सुमारे १३ हजार ८४८ शाळांमध्ये वीज नसून ४४ हजार ३३० शाळांमधील विद्यार्थ्यांना संगणक म्हणजे काय हे माहित नसल्याचे युनिफाईड डिस्ट्रिकल इन्फॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन या संस्थेने दिलेल्या अहवालातून माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर अहवालात आणखी कोणत्या बाबी स्पष्ट झाल्या आहेत,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत संगणक अनुदान प्राप्त झालेल्या शाळांना वीज बिलासाठी प्रत्येक महिन्याला रुपये ३००/- अनुदान दिले जाते असून उक्त अहवालामुळे केंद्र व राज्य शासनाची डिजीटल इंडिया योजना

अयशस्वी झाली असल्याने ७४२ शाळांमध्ये वीज नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्चूनही शालेय शिक्षण विभागाच्या उदासीन धोरणामुळे हजारो शाळांतील लाखो विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित राहत असल्याने, याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी समर्थन संस्थेने शासनाकडे केली असून याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील लाखो शालेय विद्यार्थ्यांच्या जीवनात डिजीटल क्रांती घडावी यासाठी सदर प्रकरणी सुधारणा करुन शिक्षण क्षेत्रातील अटी दूर करण्याकरिता तसेच विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण मिळावे यासाठी संगणक देवून शाळांमध्ये वीज पुरवठा करून वीज देयकासाठी प्रत्येक शाळेला मिळत असलेल्या अनुदानात वाढ करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) यु-डायसच्या आकडेवारीनुसार राज्यातील ११०३०३ शाळांपैकी १०३८६८ शाळांमध्ये विद्युतीकरण झाले आहे.

केंद्र शासनाच्या ICT (Information Communication Technology) योजनेंतर्गत ८००० शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा उभारण्यात आल्या असून त्या कार्यान्वितही आहेत.

या योजनेंतर्गत संगणक प्रयोगशाळा उभारलेल्या शाळांतील विद्यार्थी संगणक शिक्षणाचा लाभ घेत आहेत. योजनेत समाविष्ट शाळांना संगणक प्रयोगशाळेच्या वीज बिलासाठी केंद्र शासनाच्या योजनेनुसार दरमहा रुपये ३०० एवढे अनुदान देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्लास्टिक आणि थर्माकोल वस्तुंची विल्हेवाट योग्य पध्दतीने करण्याबाबत

**(४०) * ३९६६० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९२५ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक गणेशोत्सव, गौरी गणपती, दसरा, दिवाळी व खाजगी कार्यक्रमात देखावे आणि इतर वस्तु तयार करण्यासाठी वापरले जाणारे प्लास्टिक व थर्माकोलची विल्हेवाट योग्य पध्दतीने लावण्याच्यादृष्टीने शासनाने मार्गदर्शक सुचना अथवा अटी शर्ती लागू न केल्यामुळे पर्यावरण व प्रदुषणावर त्याचा परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टिक व थर्माकोलच्या वस्तुंची विल्हेवाट लावली तरी त्यांचा पूर्णपणे नाश होत नसल्याने जनावरे केरकचरा, गवत इत्यादीसह या वस्तु खातात व त्यामुळे त्यांना प्राण गमवावे लागतात, हे खरे आहे काय,

(३) तसेच, ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या वापराला देशात बंदी असताना राज्यात अशा पिशव्या सर्रास वापरल्या जात असून, शास्त्रोक्तपणे प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात स्वराज्य संस्था अपयशी ठरल्यामुळे पर्यावरणाचा प्रश्न राज्यात निर्माण झाला असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात प्लास्टिक वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला असून शासनाने याबाबतचे आदेश माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात काढले आहेत, सदर प्लास्टिक बंदी संदर्भातील निर्णयाचे व त्यासंदर्भात काढण्यात आलेल्या आदेशाचे स्वरुप काय आहे, तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नाश न होणाऱ्या थर्माकोल व प्लास्टिकची कायमस्वरुपी विल्हेवाट लावण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) नागरी घनकचरा हाताळणी व विल्हेवाट नियम, २०१६ नुसार अशा कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. तथापि, अशा कार्यक्रमांमध्ये निर्मिती अविघटनशिल कचऱ्यामुळे पर्यावरणावर परिणाम होतो, हे खरे आहे.
(२) होय.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) प्लास्टिक व थर्माकोलपासून बनविण्यात येणाऱ्या उत्पादनांवर बंदी घालण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४१) * ३९८९० प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत विविध योजनांमधील कंत्राटी कामगारांना शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याकरीता शासकीय कंत्राटी कर्मचारी संघ, सोलापूर यांनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊन मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या १० ते १२ वर्षाच्या ऐन उमेदीच्या काळात कंत्राटी कर्मचारी म्हणून काम केल्यानंतर शासकीय नोकरीची वयोमर्यादा संपल्यामुळे त्यांना या नोकरीशिवाय दुसरा पर्याय नसल्यामुळे त्यांच्या मागणीसंदर्भात शासनाने काही निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, साधारणत: किती कालावधीपर्यंत सदर कंत्राटी कर्मचारी यांना शासकीय नोकरीत समावून घेण्यात येईल त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील सिव्हील अपील क्र.६१३२-३३/२०१६ या प्रकरणी सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १२ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या न्याय निर्णयानुसार, कंत्राटी पद्धतीवरील पदे कायमस्वरुपी समजण्यात येऊ नयेत, असे आदेश दिले आहेत. त्यानुषंगाने शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४५५/कार्या.१२, दिनांक ०९/०२/२०१८ अनुसार, शासनाने कंत्राटी तत्त्वावर नियुक्तीसाठी निर्माण केलेल्या पदांवर कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी, अशा सूचना दिलेल्या आहेत. ही बाब विचारात घेता, ग्रामविकास शासकीय कंत्राटी कर्मचारी संघटना, सोलापूर शाखा यांनी त्यांच्या पत्रान्वये कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनसेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याची केलेली मागणी मान्य करता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगांव (जि.पालघर) येथील कारखान्यावर कारवाई करण्याबाबत

**(४२) * ४०१२६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगांव (जि.पालघर) येथील प्रदूषित खाडीतील हजारो मासे मृत स्थितीत गास सनसिटी येथील किनाऱ्यावर वाहून आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील नवघर, वालीव, गोखिवरे, सातीवली, चिंचपाडा येथील औद्योगिक कंपन्यांमधून घातक रसायने या खाडीमध्ये सोडली जात असल्याने त्याचा परिणाम खाडीतील जीवसृष्टीवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या परिसरातील ज्या औद्योगिक कंपन्यांकडून घातक रसायने खाडीमध्ये सोडली जातात त्या कंपनी मालकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) नायगांव (जि.पालघर) येथील प्रदूषित खाडीतील मासे मृत स्थितीत गास सनसिटी येथील किनाऱ्यावर वाहून आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आले नाही. तसेच अशा प्रकारची कुठलीही तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारखान्यांची नियमितपणे पाहणी करण्यात येत असून पाहणी दरम्यान औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा सुरळीतपणे चालविण्यात येत असल्याची खात्री करण्यात येते. पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या कारखान्यांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जल कायदा, १९७४ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

**(४३) * ४०२०६ श्रीमती स्मिता वाघ, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३४ जिल्ह्यामधील जिल्हा परिषदेच्या ६१६७३ शाळांपैकी ६१४९२ शाळांनी संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण केली परंतू १४०९२ शिक्षक अतिरिक्त असून अद्याप त्यांचे समायोजन इतरत्र शाळेत झाले नसल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ० ते १० पर्यंत पटसंख्या असलेल्या राज्यातील जिल्हा परिषदेच्या व खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येत असलेल्या १३१४ शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या १४०९२ शिक्षकांचे समायोजन करण्याच्यादृष्टीने शासनाने काय नियोजन केले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अतिरिक्त ठरणाऱ्या १४०९२ शिक्षकांचे समायोजन आगामी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला करण्यात येणार आहे काय, असल्यास, कोणत्या आधारावर करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सहार व्हिलेज, अंधेरी (मुंबई) येथील शिधावाटप दुकानात माती मिश्रीत तांदळाचे वाटप झाल्याबाबत

**(४४) * ४०४२१ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहार व्हिलेज, अंधेरी (मुंबई) येथील शिधावाटप दुकान क्रमांक १०४ मधील एका महिला दुकानदाराने माती मिसळलेले तांदळाचे वाटप केल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) हे, खरे नाही.

तथापि, शिधावाटप दुकान क्रमांक १०४ येथून माती मिश्रीत तांदळाचे वाटप करण्यात येत असल्याबाबतची बातमी दिनांक १७/०१/२०१८ रोजीच्या दैनिक पुढारी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली. त्यानुषंगाने तपासणी केली असता सदर बातमीत सत्यता दिसून आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील केंद्र व राज्य शासनाच्या स्वच्छता अभियानांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५)** * **४०५४२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील केंद्र व राज्य शासनाच्या स्वच्छता अभियानांतर्गत कुशल शौचालय योजना राबविली जात असून या योजनेतील लाभार्थ्यांना निधी मिळत नसल्याने लाभार्थ्यांनी कामे बंद केली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेचे रुपये ७४ लाख ४७ हजार ८६० येणे बाकी असून जवळजवळ ७६१ लाभार्थी लाभाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) अंतर्गत मुरबाड तालुक्यातील एकूण २२४५७ लाभार्थ्यांपैकी २२४५३ शौचालय बांधकामे पूर्ण करण्यात आली असून, लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत ४ लाभार्थी सामुहिक शौचालयाचा वापर करतात.

(३) व (४) स्वच्छ भारत अभियान (ग्रा) अंतर्गत मुरबाड तालुक्यातील शौचालय बांधकाम केलेल्या सर्व लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

## रायगड जिल्ह्यातील कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याबाबत

**(४६) * ४०५६७ श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कमी पटसंख्या असलेल्या ४२ प्राथमिक शाळा बंद करण्यात आल्या असून जिल्हा परिषद व खाजगी संस्थांनी चालविलेल्या व ० ते १० पटसंख्या असलेल्या १०३ प्राथमिक शाळा येत्या शैक्षणिक वर्षापासून बंद करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळांमधील विद्यार्थ्यांची, शिक्षक व कर्मचाऱ्यांची प्रत्येकी संख्या किती आहे व सदर शाळा बंद केल्यानंतर विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांची पर्यायी व्यवस्था कशी करण्यात येणार आहे,

(३) तसेच कोणत्याही ठिकाणी सुरुवातीला शाळा सुरु करताना विद्यार्थ्यांच्या घरापासून शाळेचे अंतर, दोन शाळांमधील अंतर व विशिष्ट भौगोलिक परिस्थिती या विहित केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता शाळा बंद करण्याऐवजी पटसंख्या वाढविण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) समायोजन झालेल्या शाळेतील विद्यार्थी संख्या ३४८ असून शिक्षक संख्या ९८ अशी आहे. या शाळांतील विद्यार्थ्यांचे समायोजन त्यांच्या शिक्षकांसह नजिकच्या शाळेत करण्यात आले आहे.

(३) शाळांतील विद्यार्थी पटसंख्या वाढविणेसाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमराळे (ता.वसई, जि.पालघर) येथील खाजगी अनुदानित शाळेने बनावट कागदपत्रे तयार करुन फसवणूक केल्याबाबत

**(४७) * ४०६१७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३६७९० ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमराळे (ता.वसई, जि.पालघर) येथील खाजगी अनुदानित शाळेने खूप कमी पटसंख्या असताना बोगस हजेरी पटाद्वारे मागील ६ वर्षात शासनाची रुपये १ कोटीपेक्षा जास्त रक्कमेची फसवणुक केल्याबद्दल तसेच जास्त विद्यार्थी संख्या दाखवून शालेय पोषण आहारात मिळणारे हजारो रुपये किंमतीचे अन्नधान्य व साधनसामुग्री यांचा अपहार करुन नमुना-दोन प्रमाणपत्रासाठी खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन ती खरी असल्याचे भासवून, शासनाची फसवणूक केल्याची चौकशी पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खूप कमी पटसंख्या असलेल्या शाळेतील शिक्षकांचे वेतन, भविष्य निर्वाह निधी, शालेय पोषण आहार व वेतनेतर अनुदान यासाठी शासनाला दरवर्षी २० लाख रुपयांहून जास्त रक्कम खर्च करावी लागत असल्याबाबतचा अहवाल शिक्षणाधिकारी (पालघर) यांच्याकडून शासनाला अद्यापपर्यंत प्राप्त झाला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उमराळे येथील शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, सदर अहवालाचे निष्कर्ष काय आहेत, तसेच चौकशी पूर्ण करुन त्यानुसार पुढील कारवाई किती मुदतीत करण्यात येईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) व्यवस्थापकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदरची बाब वस्तुस्थितीशी निगडीत आहे का? याबाबत चौकशी करण्यात येत आहे.
(३) व (४) याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

## विनाअनुदानित खाजगी व्यवस्थापनाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती योजना सुरु करण्याबाबत

**(४८) * ३७८९८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी व्यवस्थापन संस्थेद्वारे विनाअनुदानित तत्वावर शाळा सुरु करण्यात आल्या असून या शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना संस्था वेतन देत नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच शासनाच्या निधीअभावी सदर शाळेतील काही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून काही शिक्षक सेवानिवृत्त होत आहेत तर काही काही विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेवेत असताना मृत्यू पावले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सेवानिवृत्त झालेले शिक्षक, मृत्यू पावलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वारसाला सेवानिवृत्ती योजना सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधी व शिक्षक संघटना यांच्याकडून मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिक्षकांना सेवानिवृत्ती योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) विनाअनुदानित खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांतील शिक्षकांना संस्थेमार्फत वेतन देण्यात येते.
(२) हे खरे नाही.
(३) असे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याबाबत

**(४९) * ३८१०५ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी रोख स्वरूपात अदा करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातवा वेतन आयोग राज्यात लागू होत असतांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी न दिल्याने ती रोख स्वरूपात देण्याची मागणी नागपूर विभागाचे लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ व दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी पत्र पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने थकबाकी केव्हापर्यंत अदा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी जमा करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याबाबत

**(५०) * ३९१८५ श्री.बाळाराम पाटील, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २ मे, २०१२ पासून अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न करता शिक्षक भरती करण्यात आली असून दिनांक २ मे, २०१२ पूर्वी व त्यानंतर विज्ञान, गणित विषयाच्या शिक्षकांची व अल्पभाषिक, अल्पधार्मिक शाळांची पदे भरण्याची मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी मंजूरी दिलेल्या शिक्षकांना ऑनलाईन वेतन वितरीत करण्यासाठी शालार्थ आयडी नुसार ऑनलाईन मंजूरी आवश्यक असून राज्यातील जवळपास १७०० प्रस्ताव शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नागपूर विभागातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित वेतन शालार्थ वेतनप्रणालीद्वारे अदा करण्यात येते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक शाळांमध्ये नवीन नियुक्त केलेल्या शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस शिक्षणाधिकारी/शिक्षण उपसंचालक यांनी मान्यता प्रदान केल्यानंतर त्यांचे नियमित वेतन शालार्थ वेतन प्रणालीद्वारे

काढण्यासाठी शालार्थ आयडी क्रमांक आवश्यक असून नागपूर विभागातील अनेक प्रकरणे शिक्षणाधिकारी/शिक्षण उपसंचालक व वेतन पथक कार्यालयामार्फत राज्याचे शिक्षण संचालक, माध्यमिक/उच्च माध्यमिक व प्राथमिक/उच्च प्राथमिक यांच्यास्तरावर पाठवूनसुध्दा हे सर्व प्रस्ताव मागील एक ते दीड वर्षापासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शिक्षण संचालक प्राथमिक/ माध्यमिक व शिक्षण आयुक्त यांना अनेकवेळा निवेदने पाठवून व प्रत्यक्ष चर्चा करूनसुद्धा निकाली काढण्यात आले नाही, तसेच उक्त प्रकरणात दीर्घ कालावधी लागण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रलंबित प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत व शालार्थ आय.डी. लॉगीनचा अधिकार मुख्याध्यापक/प्राचार्य यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) अंशत: खरे आहे.

शिक्षण संचालक, प्राथमिक यांच्याकडे एकूण २५८ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी २९ प्रस्ताव त्यांचेकडे प्रलंबित आहे. तसेच शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्याकडे एकूण १५८४ प्रस्ताव प्राप्त असून ५९१ प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(६) प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने दिनांक २८/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये विशेष कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे.

---

## राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५१) * ३८१४० श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३९६ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी, २०१८ अखेर खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील जिल्हानिहाय शिक्षकांची एकूण रिक्त पदे किती आहेत,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) राज्यातील खाजगी शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक/ माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची अनुक्रमे २७२३, ३९०३, ४९६३ मिळून एकूण ११५८९ शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

(२) राज्यातील खाजगी शैक्षणिक संस्थासह स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकाची रिक्त पदे अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे "पवित्र" या संगणकीय प्रणाली मार्फत करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २३/०६/२०१७ रोजी पारित केलेला आहे. त्यानुसार माहे डिसेंबर, २०१७ मध्ये अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा घेण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात संच मान्यता जानेवारी, २०१८ च्या संख्येनुसार करण्याबाबत

**(५२) * ३८४१२ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संच मान्यता जानेवारी, २०१८ च्या संख्येनुसार घेण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर संचमान्यतेमुळे शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात सरलवरील विदयार्थी संख्येच्या आधारे शिक्षकांची संख्या ठरविण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला असून त्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी असलेली विदयार्थी संख्या गृहीत धरण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ जानेवारीला सरल प्रणालीवर जेवढया विदयार्थ्यांची माहिती अदयावत झाली असेल त्या संख्येनुसार शिक्षकांची संख्या निश्चित करण्यात येणार असल्याने अनेक शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत, मात्र यासाठी आवश्यक असलेले आधारकार्ड लाखो विदयार्थ्यांकडे नसल्यामुळे सदरील माहिती अद्ययावत करण्यास शिक्षकांना अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील प्रक्रियेला मुदतवाढ देण्याबाबत तसेच राज्यभरात शिक्षक अतिरिक्त ठरु नयेत याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सरल प्रणालीत नोंदविलेल्या आधार कार्ड असलेल्या व आधार कार्ड नसलेल्या सर्व विद्यार्थी सन २०१७-१८ च्या संच मान्यतेसाठी ग्राहय धरण्यात आलेले आहेत. तसेच एखाद्या गटातील विद्यार्थी संख्या कमी झाल्यास त्या गटातील कमी होणारे पद शाळेतील अन्य गटास देय होत असल्यास सदर पद देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानामधून मक्याचे वाटप बंद करण्याबाबत

**(५३) * ३८३९७ श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानामधून गहू व तांदूळ यासोबत प्रथमच मक्याचे वाटप सुरु केले असून रुपये दोन किलोप्रमाणे प्रती व्यक्ती एक किलो मक्याचे वाटप होत असून मका धान्य दळण्यासाठी खर्चिक असल्याने अनेकांनी मका घेण्यास नकार दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

पंढरपूर, जि.सोलापूर येथे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रती शिधापत्रिका ६ किलो व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती १ किलो याप्रमाणे व माहे जानेवारी, २०१८ मध्ये अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिशिधापत्रिका ४ किलो व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती १ किलो याप्रमाणे प्रतिकिलो रुपये १/- या दराने मक्याचे वाटप करण्यात आलेले आहे.

सदर मका घेण्यास नकार दिल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुदानित माध्यमिक शाळेत शिक्षण सेवक म्हणून तीन वर्षाचा सेवाकाळ पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकाच्या नियुक्तीबाबत

**(५४) * ३८८१६ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुदानित माध्यमिक शाळेत शिक्षण सेवक म्हणून तीन वर्षाचा सेवाकाळ पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकांची नियुक्ती अन्य अनुदानित शाळेत नियमित वेतनश्रेणीवर शिक्षक पदी करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा तऱ्हेने बदली होणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्तीस वैयक्तिक मान्यता देतांना काही तांत्रिक अडचणी येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शैक्षणिक अर्हता योग्य असलेल्या प्राथमिक शाळेतील तीन वर्षे पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकास माध्यमिक शाळेत व माध्यमिक शाळेतील शिक्षण सेवकास उच्च माध्यमिक शाळेत नियमित वेतनश्रेणीत नियुक्त करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच, प्राथमिक शाळेतील नियमित वेतन श्रेणीतील शिक्षकास माध्यमिक शाळेत व माध्यमिक शाळेतील शिक्षकास उच्च माध्यमिक शाळेत संस्थेने नियुक्त केल्यास वेतनास संरक्षण मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अशा शिक्षण सेवकांची अन्य अनुदानित माध्यमिक शाळेत नियमित वेतनश्रेणीवर शिक्षक पदी नियुक्ती करता येते, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अशाप्रकारे करण्यात आलेल्या नियुक्तीस दिनांक १५ सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार वेतनास संरक्षण राहणार नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता ठेवण्याबाबत

**(५५) * ३८७१३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१२/(२३७/१२) वि.शी.१, दिनांक १७ सप्टेंबर, २०१३ अन्वये सामाजिक आरक्षणानुसार तात्पुरत्या स्वरुपात किंवा तासिका तत्वावर मागास प्रवर्गातील नेट/सेट/पीएचडी धारक उमेदवार न मिळाल्यास इतर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांच्या नियुक्तीस विद्यापीठ मान्यता देते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खुल्या व ओ.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांची तासिका तत्वावर नेमणूकीसाठी नेट/सेट/पीएचडी धारक नसलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीस विद्यापीठ मान्यता देत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिक्षक मिळत नसल्याने, मागासवर्गीय व खुल्या ओ.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारास तासिका तत्वावर नियुक्तीसाठी समान शैक्षणिक अर्हता ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बदलापूर हायस्कूल, (बदलापूर, जि.ठाणे) शाळेत शालेय पोषण आहार योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५६) * ३९१२५ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर हायस्कूल, बदलापूर (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) या शाळेत शालेय पोषण आहार योजनेत मागील तीन-चार वर्षापासून अनियमितता व निकृष्ट दर्जाचे अन्न विद्यार्थ्यांना देण्यात येत असल्याबाबत पालकांनी दिनांक ३ मे, २०१७ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे लेखी तक्रार करुनही गटशिक्षण अधिकारी कार्यालयाकडे यासंदर्भातील कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याची खोटी व दिशाभूल करणारी माहिती लेखी स्वरुपात संबधित अधिकाऱ्यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) बदलापूर हायस्कूल, बदलापूर जि.ठाणे या शाळेत शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अनियमितता व निकृष्ट दर्जाचे अन्न विद्यार्थ्यांना देण्यात येत असल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून दोंषी मुख्याध्यापका विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे. तसेच, योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित न केल्याने याबाबत संबंधित गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक (शापोआ), यांना कर्तव्यात कसूर केल्याबाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विनाअनुदानित शाळांना योजनांतर्गत मधून योजनाबाह्यमध्ये रुपांतरीत करण्याबाबत

**(५७) * ३८८५५ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विनाअनुदानित शाळांना अनुदान देताना पंचवार्षिक योजनेंतर्गत निधी दिला जात असून पंचवार्षिक योजना संपल्यानंतर सदर शाळा योजनाबाहय कृती आराखड्याबाहय केल्या जातात व त्यांना नियमित निधी मंजूर केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००७ ते २०१२ व २०१२ ते २०१७ अशा जवळपास १० वर्षापासून अनुदान मंजूर झालेल्या शाळा कृती आराखड्यामध्ये असल्यामुळे त्यांच्या नियमित वेतनामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विनाअनुदानित शाळांना योजनांतर्गतमधून योजनाबाहयमध्ये रुपांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

वित्त विभागाच्या दिनांक २७/१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये योजनांतर्गत व योजनेतर संकल्पना बंद करण्यात येऊन वेतनाच्या योजना या अनिवार्य खर्चामध्ये समाविष्ट करण्यात आला असून वेतनाकरीता उणे प्राधिकार पत्राद्वारे खर्च करण्यास परवानगी असल्याने निधीबाबत कोणतीही अडचण नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## नाशिक येथे मराठी भाषा भवन उभारण्याबाबत

**(५८) * ३७९८३ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०५५ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक धोरणानुसार मराठी भाषेचा विकास, संवर्धन, जतन व संरक्षण करण्याच्यादृष्टीने स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली असून मराठी भाषा भवनासाठी आवश्यक ती जागा उपलब्ध करण्यासाठी महसूल विभागाकडे विचारणा करण्यात आली होती त्यानुषंगाने महसूल विभागाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महसूल विभागाकडून प्राप्त अहवालानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, महसूल विभागाकडून अहवाल प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत व मराठी भाषा भवन उभारण्याकरिता जागा उपलब्ध करण्यासंदर्भातील कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) मराठी भाषा विभागाच्या विविध उपक्रमांकरीता तसेच क्षेत्रिय कार्यालयांकरीता मुंबई परिसरात भाषा भवनासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत महसूल व वन विभागाकडे विचारणा करण्यात आली आहे. विभागाने सूचित केलेल्या जागांसंबंधी संबंधितांकडून माहिती घेण्यात येत असल्याचे महसूल व वन विभागाने कळविले आहे.

(३) सदर जागांबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी संबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे अभिप्राय दिले आहेत. याबाबतचा पाठपुरावा सुरु आहे.

---

## ग्राहक संरक्षण कायद्यामध्ये बदल करुन डाळींसह इतर जीवनावश्यक वस्तुंचे दर नियंत्रित ठेवण्याबाबत

**(५९) * ३७९३० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मोहनराव कदम, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९८० ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्राहक संरक्षण कायद्यात ग्राहक संरक्षणाचा तसेच व्यापाऱ्यांवर अंकुश ठेवण्याबाबत तरतूद नसल्याने कायदा हा काळाप्रमाणे बदलायला पाहिजे म्हणून सध्याच्या ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ मध्ये आमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न सुरक्षा कायद्यात बदल करण्याबाबत प्रस्ताव अन्न व औषध विभागाने केंद्र शासनाकडे पाठविला आहे, उक्त प्रस्तावाला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे काय, तसेच याबाबतची अंमलबजावणी राज्यात करण्यात येणार आहे काय, तसेच अद्याप, केंद्र शासनाची मान्यता उक्त प्रस्तावाला मिळाली नसल्यास त्याबाबत राज्य शासन पाठपुरावा करील काय,

(३) तसेच, शासनाने दिनांक २८ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये तुर/तुरडाळ, खाद्यतेल, खाद्यतेल बिया व इतर कडधान्य यांच्या किंमती नियंत्रित ठेवण्याच्या अनुषंगाने उपाययोजना (Action Plan) तयार करण्यासाठी दर नियंत्रक समिती (Price Monitering Committee) गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याचे प्रारुप करण्यात आले असून सदर प्रारुपाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने अतिरिक्त माहिती उपलब्ध करून देण्याबाबत राज्य शासनास कळविल्यानुसार सदरहु माहिती केंद्र शासनास सादर करण्याबाबतची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राहक संरक्षण कायदा १९८६ च्या कलम २(१)(डी) मध्ये ग्राहकांच्या संरक्षणाच्या व्याप्ती वाढविण्याबाबत तसेच राज्यात डाळींसह इतर जीवनावश्यक वस्तुंचे दर नियंत्रित ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) सुधारित ग्राहक संरक्षण अधिनियम होणेसाठी संसदेत विधेयक प्रलंबित आहे.
(२) देशात अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ हा नवीन कायदा दिनांक ५/८/२०११ पासून लागू झाला असून, त्यामध्ये शिक्षेच्या व दंडाच्या तरतुदी आहेत. तथापि, काही ठराविक गुन्हयांमधील भेसळ रोखण्यासाठी जास्त शिक्षेची तरतूद असावी, यासाठी या कायद्यातील नमूद शिक्षा वाढविण्याच्या दृष्टीने सुधारणा व सूचनांचा प्रस्ताव सादर केला आहे. केंद्र सरकारचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने अन्न सुरक्षा व मानके कायद्याचा comprehensive review (व्यापक पुराविलोकन) घेण्याबाबत समिती स्थापन केली होती. सदर समितीपुढे अन्न सुरक्षा कायद्यात सुधारणा करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने सुधारणा व सूचनांचा प्रस्ताव सदर समितीला पाठविलेला आहे.
(३) होय. हे खरे आहे.
(४) व (५) डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याच्या प्रारूपाबाबत केंद्र शासनाने अतिरिक्त माहिती मागितली आहे. त्यानुषंगाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. त्यास अनुसरून केंद्र शासनास अभिप्राय सादर करण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराचे थकित देयक अदा करण्याबाबत

**(६०) * ३८६४६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून सोलापूर जिल्ह्यातील इयत्ता पहिली ते पाचवी व इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सर्वशिक्षा अभियानाच्या माध्यमातून होणाऱ्या शालेय पोषण आहारांतर्गत भात शिजवण्यासाठी लागणाऱ्या इंधन, भाजीपाला खर्चासाठी अनुदान शासनाने दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आहार पुरवठा योजनेच्या निधी वितरणासाठी ऑनलाईन पध्दत स्वीकारल्याने माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीतील सोलापूर जिल्ह्यातील शाळांची ५ कोटी ८९ लाख ७ हजार रुपयांची देयके ऑनलाईन प्रणालीमुळे थकित राहिली असल्याने शिक्षक संघटनांनी पोषण आहार शिजवून देण्यावर बहिष्कार टाकण्याचे निवेदन शिक्षणाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यंदाच्या वर्षापासून शालेय पोषण आहारांतर्गत देण्यात येणारा निधी ऑनलाईन पध्दतीने देण्याचे शासनाचे प्रयोजन असून त्याकरिता लागणारे सॉफ्टवेअर प्रणालीचे काम पूर्ण न झाल्याने सुमारे ६ महिने विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रणालीसाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे व तद्नंतर किती दिवसात थकित देयके अदा करण्यात येतील,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकित वेतन अदा करण्याबाबत व सॉफ्टवेअर प्रणालीचे काम पूर्ण होईपर्यंत जुन्याच पध्दतीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच पोषण आहार सुरळीत करण्याबाबत

कार्यवाही करुन थकित देयक व विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहण्यास जबाबदार असलेल्या सॉफ्टवेअर कंपनीविरुध्द व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) अशा स्वरुपाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती.
(३) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार इंधन व भाजीपाला यांची देयके जिल्हास्तरावरुन थेट लाभार्थ्यांच्या खात्यात ऑनलाईन पध्दतीने अदा करणे आवश्यक आहे. यासाठी योजनेच्या पोर्टलवर शाळांनी माहिती भरल्यानंतर देयके तयार होतात. काही तांत्रिक अडचणींमुळे सोलापूर जिल्ह्यातील इंधन-भाजीपाला व नागरी भागातील धान्यादी मालाची देयके अदा करण्यासाठी विलंब झालेला आहे. तथापि, देयकांच्या अदायगीत झालेल्या विलंबामुळे विद्यार्थी आहारापासून वंचित राहिलेले नाहीत.
(४) सद्य:स्थितीत सोलापूर जिल्ह्यातील ८ तालुके व १ मनपा यांची माहे सप्टेंबर, २०१७ पर्यंतची देयके अदा करण्यात आली असून माहे ऑक्टोबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ पर्यंतची देयके अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विनाअनुदानित शाळांच्या अनुदानाचा व बायोमेट्रिक हजेरीचा निर्णय मागे घेण्याबाबत

**(६१) * ३९१०४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम उपनगरातील काही विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक व विद्यार्थी यांनी १०० टक्के अनुदानाच्या मागणीसह बायोमेट्रिक हजेरीचा निर्णय मागे घेण्यासाठी काळया फिती लावून शासनाचा निषेध केल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील विनाअनुदानित शाळांच्या अनुदानाचा व बायोमेट्रिक हजेरीचा निर्णय मागे घेण्याची मागणी राज्य विनाअनुदानित कृती समितीने शासनाकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक कमी वेतनावर काम करीत असून त्यांना वेळेवर वेतन मिळत नसल्याने राज्य सरकाच्या शिक्षण विभागाशी संबंधित जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आलेली बायोमेट्रिक हजेरी पध्दत बंद करण्याचा निर्णय ग्रामविकास खात्याने घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्व विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान देण्यासह बायोमेट्रिक हजेरीची पध्दत बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) होय.

(३) ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १८ डिसेंबर, २०१७ अन्वये जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेली बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बंद करण्यात आली आहे.

(४) शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकोतर कर्मचाऱ्यांमध्ये वक्तशीरपणा राखण्याच्यादृष्टीने बायोमेट्रिक हजेरीचा समावेश शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ मध्ये करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील लिंगायत समाजाला अल्पसंख्याक समाजाचा दर्जा देण्याबाबत

**(६२) * ४०५०८ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४४१ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लिंगायत समाजाला अल्पसंख्याक समाजाचा दर्जा मिळावा या मागणीसह इतर मागण्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगांवसह इतर विविध ठिकाणाहून आलेल्या लिंगायत समाजातील लोकांनी दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी मोर्चा काढून जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिंगायत समाजातील लोकांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत, तसेच लिंगायत समाजाला अल्पसंख्यांक समाजाचा दर्जा देण्याबाबत मंत्रिमंडळाने सन २०१४ मध्ये निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागण्या मान्य करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाद्वारे खालीलप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत.

१. महाराष्ट्र शासनाने दिनांक २६/०८/२०१४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी त्वरीत करुन लिंगायत धर्माला स्वतंत्र धर्म म्हणून संवैधानिक मागणी मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करावी.

२. लिंगायत धर्मास धार्मिक अल्पसंख्याक दर्जा मिळावा.

दिनांक २८/०८/२०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत लिंगायत समाजास अल्पसंख्याक समाजाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) व (४) अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे दिनांक १३/०५/२०१४ रोजीचे अभिप्राय राज्य शासनास पाठविले आहे व त्यामध्ये लिंगायत हा स्वतंत्र धर्म नसून हिंदू धर्माचा एक पंथ असल्याचे नमूद केले आहे. तसेच महारजिस्ट्रार गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १४/११/२०१३ च्या पत्रान्वये लिंगायत हा हिंदू धर्माचा पंथ असल्याने सन २०११ च्या जनगणनेमध्ये लिंगायत समाजाची स्वतंत्र नोंद घेण्यात आलेली नाही असे नमूद केले आहे. सबब, लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माचा व अल्पसंख्याक दर्जा देणे अनुज्ञेय नाही. तथापि, लिंगायत समाजास अल्पसंख्याक दर्जा देण्याबाबतच्या विनंतीची विविध संघटनांची निवेदने सप्टेंबर, २०१४ मध्ये केंद्र शासनास पाठविण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरटीई अंतर्गत शाळेत प्रवेश देणाऱ्या शहरातील विनाअनुदानित शाळांवर कारवाई करण्याबाबत

**(६३) * ३७७११ श्री.हरिसिंग राठोड, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जनार्दन चांदूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३१०८२ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिकदृष्टया गरीब विद्यार्थांना शिक्षण हक्क कायद्यानुसार विनाअनुदानित खाजगी शाळांमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी शाळांना देय असलेली ८०० कोटी रुपयांची थकबाकी शासनाने मागील ५ वर्षापासून दिली नसून याकरिता शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के इतक्या विद्यार्थ्यांना प्रवेश विनाअनुदानित शाळांमध्ये देण्यात

येणार नाही, अशी फेडरेशन ऑफ स्कुल असोसिएशन ऑफ महाराष्ट्राने शासनाला नोटीस दिली असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नामांकित शाळेत २५ टक्के प्रवेश कोटा शासनाने निश्चित केला असला तरी या प्रवेश प्रक्रियेची सामान्य पालकांपर्यंत माहिती पोहचविण्यात शासन अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात आरटीई मधून खाजगी शाळेत १ लाख १९ हजार ८७६ जागा असून चालू शैक्षणिक वर्ष संपत आले असतांना यातील ५६ हजार ५७९ जागा भरल्याच नसल्याचे शिक्षण विभागानेच जाहीर केलेल्या आकडेवारीत स्पष्ट झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) तसेच, पुणे शहरातील विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण हक्क कायदयानुसार (आरटीई) आरक्षित २५ टक्के जागांवर गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश न देता इतर खाजगी विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यासाठी खाजगी शाळेमध्ये पहिल्या वर्गात २५% प्रवेश कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक असतांना हे प्रवेश दिले गेले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रवेश प्रक्रियेची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी यासाठी या योजनेबाबत पालकांत जागृती करण्याबाबत कार्यवाही करुन आरटीई अंतर्गत गरीब विद्यार्थ्यांना डावलून इतर खाजगी विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देणाऱ्या शहरातील विनाअनुदानित शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. तथापि, अशा आशयाच्या बातम्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात आरटीई २५ टक्के प्रवेशाच्या एकूण १२०८२२ जागांपैकी ६३९६९ जागांवर विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतला आहे.
(४) व (५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शांताबाई मुंजाजी दराडे विद्यामंदिर शाळा, हिंगोली (जि.हिंगोली) येथे शालेय पोषण आहारातील तांदळाचा अपहार झाल्याबाबत

**(६४) * ३९०४२ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शांताबाई मुंजाजी दराडे विद्यामंदिर शाळा, हिंगोली (जि.हिंगोली) या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी आलेल्या शालेय पोषण आहाराचा जवळपास ६० क्विंटल तांदूळ काळ्या बाजारात विकण्यास नेत असताना पोलिसांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पकडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शाळेच्या मुख्याध्यापकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांसाठी असलेल्या तांदळाचा अपहार करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, वाहन चालक व वाहन मालक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सक्षम अन्न प्रयोगशाळा कार्यान्वित करण्याबाबत

**(६५) * ३८७६१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फूड सेफ्टी ॲण्ड स्टॅण्डर्डच्या (एफएसएस) नियमावलीनुसार अन्न तपासणी प्रकरणात संबंधित अधिकाऱ्याने ९० दिवसात निकाल लावणे अपेक्षित असताना, सन २०११ ते २०१६ याकालावधीत राज्यात केवळ एकच अन्न प्रयोगशाळा असल्याने ६९४ प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अन्न तपासणीची हजारो प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे कॉम्पट्रोलर ॲण्ड ऑडिटर जनरल ऑफ इंडिया (कॅग) ने आपल्या अहवालात नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने राज्यातील प्रयोगशाळांना माहे ऑक्टोबर, २०१६ च्या योजनेनुसार एनबीएल मानांकन आवश्यक असल्याचे आदेश दिले होते, त्यासाठी त्यांना दोन वर्षाची मुदत देवूनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात अन्न प्रयोगशाळा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

तथापि, दिनांक २७/१२/२०१७ च्या दैनिक सकाळमध्ये या आशयाचे वृत्त प्रकाशित झाले आहे.

(२) कॉम्पट्रोलर ॲण्ड ऑडिटर जनरल ऑफ इंडिया (कॅग) ने दिलेला अहवाल प्रशासनास प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या कलम ४३ नुसार अन्न चाचणी प्रयोगशाळेस एनएबीएल मानांकन घेणे आवश्यक आहे. तथापि, अन्न सुरक्षा व मानके २००६ च्या कलम ९८ नुसार अन्न भेसळ प्रतिबंधित कायदा, १९५४ मध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व अन्न चाचणी प्रयोगशाळा या नवीन कायद्याप्रमाणे अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. प्रशासनाच्या मुंबई, नागपूर व औरंगाबाद या तीन प्रयोगशाळापैकी मुंबई व नागपूर येथिल प्रयोगशाळेस एनएबीएल नामांकन मिळालेले आहे. तसेच औरंगाबाद येथील प्रयोगशाळेस एनएबीएल नामांकनासाठी प्रक्रिया सुरु केली आहे.

या व्यतिरिक्त आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील आरोग्य प्रयोगशाळेत देखिल अन्न नमुने तपासले जातात. त्यापैकी राज्य आरोग्य प्रयोगशाळा पुणे ही एनएबीएल मानांकन प्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) येथे अभ्यासिका स्थापन करण्याबाबत

**(६६) * ३८२४८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोकळ्या वेळेत अभ्यास करण्यासाठी कोणतीच सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालय, शाळा सुटल्यानंतर गावाकडे जाणारी एस.टी. ची वेळ होईपर्यंत विद्यार्थ्यांचा महत्वचा वेळ वाया जात असून विद्यार्थ्यांच्या वेळेची बचत व्हावी व त्यांना मोकळ्या वेळेत अभ्यास करता यावा याकरिता अभ्यासिका स्थापन करण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दापोली येथील एस.टी. बस डेपोच्या शेजारी असलेल्या मैदानात अभ्यासिका बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अशी बाब उच्च शिक्षण संचालनालयाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) दापोली येथील महाविद्यालयांमध्ये अभ्यासिका/ग्रंथालयाची सोय उपलब्ध आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कॉर्पोरेट कंपन्यांना कोणत्याही माध्यमाच्या शाळा सुरु करण्याच्या शासनाच्या धोरणाचा फेरविचार करण्याबाबत

**(६७) * ३८५८४ श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कॉर्पोरेट कंपन्यांना कोठेही कोणत्याही माध्यमाच्या शाळा सुरु करण्यास परवानगी देणारे विधेयक विधानसभेत मंजूर झाल्यामुळे शासनाच्या या धोरणावर तीव्र प्रतिक्रिया होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच शासनाच्या या धोरणाच्या विरोधात नाशिक जिल्ह्यात दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळा प्रवेशासाठी गुणवत्तेपेक्षा पैसा हा घटक महत्वाचा ठरणार असल्याने शासनाच्या या धोरणामुळे गोरगरीब, बहुजन, वंचितांची मुले शिक्षणापासून वंचित रहाणार असल्यामुळे या धोरणाविरोधात रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याचा इशारा सर्वस्तरावरुन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॉर्पोरेट कंपन्यांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आल्यास राज्यातील सर्वच मान्यता प्राप्त अनुदानित शाळांवर त्याचा परिणाम होणार असल्याने शासनाने याबाबत पुनःर्विचार करावा आणि प्रस्तावित निर्णय मागे घ्यावा, अशीही मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निर्णयामुळे अस्तित्वातील शाळांतील विद्यार्थी संख्या कमी होऊन या शाळांचे व तेथे कार्यरत कर्मचाऱ्यांचे भवितव्य संकटात येणार असून पालकांनाही प्रचंड शिक्षण शुल्क भरावे लागणार असल्याने शासनाने कार्पोरेट कंपन्यांना शाळा सुरु करण्यास परवानगी देऊ नये, असे शिक्षण क्षेत्रातून तीव्र विरोध करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कॉर्पोरेट कंपन्यांनी नविन शाळा सुरु करण्याऐवजी आहे त्याच अनुदानित व अन्य शाळा सक्षम करण्यासाठी कॉर्पोरेटच्या सी.एस.आर. निधीचा वापर करावा, अशीही मागणी शिक्षण क्षेत्रातुन शिक्षण तज्ज्ञ, शिक्षक संघटना व शिक्षकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू धोरणाबाबत फेरविचार करुन राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणक्षेत्रात समान संधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करुन सदरील धोरण मागे न घेतल्यास राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक संघटनांनी दिल्याच्या पार्श्वभुमीवर शासनाकडून याबाबत कोणता पुनःर्विचार व निर्णय घेण्यात आला वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मध्ये सुधारणा विधेयक मंजूरीसाठी विधिमंडळाच्या विचाराधीन आहे. या सुधारणेत कंपनी कायदा, २०१३ खालील कलम ८ नुसार स्थापन झालेल्या कंपनीस शाळा स्थापन करण्यासाठी अर्ज करता येईल अशी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

तथापि, याबाबत काही ठिकाणी विरोध होत आहे.

(३), (४), (५) व (६) कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ८(१)(अ) खालील तरतुदीनुसार धर्मादाय उद्दिष्टासाठी नोंदणीकृत झालेल्या कंपनीस शैक्षणिक क्षेत्रात कार्य करण्याची इच्छा असल्यास तशी संधी मिळावी याकरीता

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मध्ये तशी सुधारणा प्रस्तावित करण्यात आली आहे. या कलमाव्यतिरिक्त अन्य कलमाखाली नोंदणीकृत झालेल्या कंपनीस शाळा सुरु करण्याची तरतुद प्रस्तावित नाही.

---

## राज्यात युवा धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(६८) * ३९७८८ श्रीमती हुस्नबानू खलिफे : दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक १९४५२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२ मध्ये विद्यमान मुख्यमंत्री यांच्या सहभागातून तयार करण्यात आलेल्या आणि सन २०१४ मध्ये शासनाने स्वीकारलेल्या युवा धोरणाची मागील सहा वर्षापासून अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोरणानुसार राज्यातील तरुणांच्या कौशल्य, रोजगार, आणि नेतृत्व विकासाच्यादृष्टीने २० योजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या परंतू युवा पुरस्कार, युवा शिबिरे आणि युवा महोत्सव या उत्सवी आणि दिखाऊ सोहळयाचे आयोजन शासनाने केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या ठिकाणी युवा वसतिगृहे बांधण्याबाबत कोणतीही मार्गदर्शक नियमावली, कर्मचारी, त्यांची शैक्षणिक अर्हता आणि जबाबदाऱ्यांचे नियोजन करण्यात आले नसल्याने युवकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बिजलवाडी (ता.देगलूर, जि.नांदेड) येथील स्वस्त धान्य दुकानांची चौकशी करण्याबाबत

**(६९) * ३८५२३ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिजलवाडी (ता.देगलूर, जि.नांदेड) येथील स्वस्त धान्य दुकानदार धान्याची काळया बाजारात विक्री करुन परराज्यात धान्य पाठवित असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धान्य विक्रीमुळे येथील दारिद्रयरेषेखालील निराधार, आर्थिक दुर्बल लाभार्थ्यांना धान्य मिळत नसून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील दुकानदारांवर शासनाची व जनतेची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करावा असे येथील ग्रामस्थांनी तहसिलदार यांना निवेदन देवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बिजलवाडी येथील स्वस्त धान्य दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणात सर्व ग्रामस्थांनी निवेदन देवून तक्रार केली नसून केवळ चार व्यक्तींनी तक्रार अर्ज केलेले आहेत.

(४) तक्रार प्राप्त झाल्यानंतर मौजे बिजलवाडी येथील तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या चौकशी अहवालानुसार माहे डिसेंबर, २०१७ चे धान्य संबंधित स्वस्त धान्य दुकानात नियमितपणे धान्य वाटप चालू असल्याचे नमूद केले आहे. तसेच संबंधित स्वस्त धान्य दुकानाचे माहे जानेवारी, २०१८ चे धान्य तलाठी, पोलीस पाटील व गावातील इतर नागरीक यांचे समक्ष धान्य वाटप केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोट (जि.अकोला) तालुक्यातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(७०) * ३८१५८ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ३६४४७ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट ८४ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमध्ये खारपाणपट्ट्यातील अकोट, तेल्हारा आणि अकोला (जि.अकोला) तालुक्यातील गावांचा समावेश करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेमध्ये प्रभागातील संयुक्त टाकीपासून गावातील उंच टाकीपर्यंत पी.व्ही.सी. च्या पाईपलाईनवर नळ कनेक्शन असल्यामुळे सदर पाईपलाईनद्वारे गावातील उंच टाक्या भरल्या जात नसल्याने गावातील उंच भागातील घरांना पाणीपुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे रुपये १०.२० कोटीच्या प्रस्तावित कामात समाविष्ट असलेली कामे पूर्ण झालेली आहेत परंतू संपूर्ण पाईपलाईन बदलली गेली नसल्यामुळे अद्यापही ८/१० गावांना टाकीद्वारे पाणीपुरवठा करणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त योजना सुरळीत होण्याकरिता ८० कि.मी लोखंडी (डी.आय.) पाईपलाईन टाकण्याबाबत तसेच सदर योजनेकरिता तेल्हारा शहर, अकोट शहर आणि ८४ गावांकरिता धरणापासून एकच पाईपलाईन असून अकोट शहराची योजना व ८४ गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देखभाल व दुरुस्तीकरिता असल्याने ती वसुलीसह घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबत कधीपर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत या योजनेतील ६६ गावांना उंच टाकीतून पाणीपुरवठा सुरु आहे. व १३ गावांना बायपासद्वारे पाणीपुरवठा सुरु आहे. एका गावाचा (पराळा) पाणीपुरवठा बंद आहे.

(३) अंशत: खरे आहे,

शासनाने मंजूर केलेल्या रुपये १०.२० कोटीच्या योजनेतील पाईपलाईनचे काम पुर्ण झाले असून १२७ किलोमीटर पी.व्ही.सी. पाईपलाईन पैकी ५६ किलोमीटर लोखंडी पाईपलाईन टाकण्यात आली आहे.

(४) जिल्हा परिषद, अकोलाकडे सन २०१७-१८ पर्यंत रुपये १६ कोटी ९२ लक्ष इतकी थकबाकी असून मागील तीन वर्षाची पाणीबीलाची रक्कम सुमारे रुपये ७ कोटी ५१ लक्ष व पाणीपट्टी वसूली रुपये १ कोटी ७४ लक्ष इतकी असणे, सदर योजनेचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च रुपये २ कोटी ८४ लक्ष इतका आहे. मोठया प्रमाणावरील थकबाकीमुळे सदर योजनेच्या देखभाल व दुरुस्तीवरील खर्चाअभावी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास योजना चालविणे शक्य नाही. तुर्तास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निधीद्वारे योजना तात्पुरती चालविली जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागझरी (तांबडी पाडा) (जि.पालघर) येथे पाणीपुरवठा करण्याबाबत

**(७१) * ४०११४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागझरी (तांबडी पाडा) (जि.पालघर) येथील आदिवासी उपयोजनेतील पाणी पुरवठ्याची विद्युत मोटार जळून पाणीपुरवठा बंद झाल्याने शेकडो कुटुंबांनी नागझरी ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसेवकाकडे बंद झालेला पाणीपुरवठा सुरु करण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी पाणीपुरवठा सुरु करण्यासाठी श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली पालघर पंचायत समितीच्या प्रवेशद्वारासमोर प्रशासनाच्या विरोधात दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद झालेला पाणीपुरवठा सुरु होण्यासाठी तसेच पाणीपुरवठयाची जळालेली मोटार दुरुस्त व बदली करुन कार्यवाही होण्यासाठी समर्थन संस्थेने मा.ऊर्जा मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्याकडे दिनांक ०६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागझरी (तांबडी पाडा) (जि.पालघर) येथील बंद झालेला पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) या विषयाबाबत गटविकास अधिकारी यांच्या दालनात आयोजित केलेल्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कनिष्ठ अभियंता व विस्तार अधिकारी यांनी दिनांक ०४/०१/२०१८ रोजी ग्रामपंचायतीला भेट दिली असता तेथील योजनेची पाण्याची मोटार जळालेली असल्यामुळे पाण्याचा पुरवठा करता येत नव्हता असे दिसून आले. सदर मोटार तात्काळ दुरुस्त करण्याबाबत ग्रामपंचायतीस निर्देश देण्यात आले. त्यानुसार ग्रामपंचायतीमार्फत मोटार दुरुस्त करुन पाणीपुरवठा सुरळीतपणे सुरू करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्णी व पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

**(७२) * ४०६२४ प्रा.डॉ.तानाजी सावंत, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०४१ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलू (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे हिवाळ्यातच शासनाच्या नियोजनाच्या अभावामुळे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे पिडीत ग्रामस्थांनी आर्णी तहसील कार्यालयावर पाण्यासाठी मोर्चाच्या माध्यमातून माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पांढरकवडा तालुक्यासह यवतमाळ जिल्ह्यातील नदी नाले पाण्याअभावी कोरडे पडले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत सचिव आणि तलाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्वंयस्पष्ट अहवाल सादर करण्यास दिरंगाई करीत असून दरवर्षीप्रमाणे पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या विहीरी अधिग्रहण करणे अपेक्षित असताना अद्यापही विहीरी अधिग्रहणाबाबत काहीच कार्यवाही संबंधितांकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पांढरकवडा तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याबाबत कार्यवाही करुन शासकीय कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील पाणी टंचाईच्या अनुषंगाने संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयानुसार ६११ खाजगी विहिर अधिग्रहण प्रस्तावीत असून सद्य:स्थितीत आवश्यकतेनुसार ७४ खाजगी विहिरी अधिग्रहण प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जोगेश्वरी (प.), मुंबई येथे अनधिकृत बांधकाम झाल्याबाबत

**(७३) * ४०१३५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वक्फ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (प.), मुंबई येथील दर्गाह-ए-गौसिया ट्रस्ट, फकीरवाडी, ही नोंदणीकृत वक्फ संस्था असून या वक्फ संस्थेच्या संबंधित असलेली वक्फ मिळकत सर्व्हे नं. ३५, हिस्सा नं. १६ सिटीएस क्र. ४५ क्षेत्र १४७५ चौ.मीटर जागेवर मेसर्स सहयोग होम्स या विकासकांकडून अनधिकृतपणे टॉवर्सचे बांधकाम सुरु करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार याप्रकरणात दोषी असलेल्या विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

(२) दर्गाह-ए-गौसिया ट्रस्ट, ही नोंदणीकृत वक्फ संस्था असून या संस्थेचा नोंदणी क्रमांक एमएसबीडब्ल्यु/ एमयुएम/२४५/११, दिनांक ०८/११/२०११ असा आहे. तहसिलदार, अंधेरी यांनी दिनांक ०६/०३/२०१८ रोजी सदर स्थळास प्रत्यक्ष भेट देऊन सादर केलेल्या स्थळ पाहणी अहवालानुसार सर्व्हे नं.३५, हिस्सा नं.१६ सिटीएस क्र.४५ क्षेत्र १४७५ चौ.मिटर या जागेवर टॉवर्सचे बांधकाम सुरु नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पेट्रोल पंपावरील पेट्रोल वाहिका पारदर्शक करण्याबाबत

**(७४) * ४०२१२ श्रीमती स्मिता वाघ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७८५ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पेट्रोल पंपावर चिप लावून पेट्रोल चोरी प्रकाराला प्रतिबंध घालण्यासाठी पेट्रोल पंपावर पारदर्शक नळी बसविण्याची तसेच बिलावर जीएसटी क्रमांक असल्याशिवाय जीएसटी रक्कम आकारु नये अशी मागणी ग्राहक संरक्षण परिषदेने शासनाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील पेट्रोल पंपावर पारदर्शक नळी बसवून पेट्रोल वाहिका पारदर्शक करण्याबाबत व जीएसटी क्रमांक असल्याची सक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) पेट्रोल पंपावर पारदर्शक नळी बसविण्याबाबतचे निवेदन ग्राहक संरक्षण परिषदेकडून प्राप्त झालेले नाही. परंतू इतर प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने पेट्रोल पंपावर पारदर्शक नळी बसविण्यासंदर्भातील सूचनांची तेल कंपन्यांकडून दखल घेण्यात आली आहे.

पेट्रोल विक्रीचा समावेश जीएसटी अंतर्गत नसल्याने पेट्रोल पंपावर मिळणाऱ्या बिलावर जीएसटी क्रमांक असणार नाही. तसेच त्यावर जीएसटीची आकारणी होत नाही.

---

## शैक्षणिक सहलींना स्थानिक सहल कर वसुलीमधून सूट मिळणेबाबत

**(७५) * ३७६९५ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यटन ठिकाणी प्रेक्षणीय स्थळ पाहण्यास जाणाऱ्या नागरिकांना स्थनिक कर द्यावा लागतो तसेच पर्यटन ठिकाणी प्रत्येक वर्षी शालेय सहलींचे आयोजन करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा पर्यटन ठिकाणी शालेय सहलीस आलेल्या विद्यार्थ्यांकडून स्थानिक कर वसूल केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा पर्यटन ठिकाणी घेत असलेल्या स्थानिक करामधून शालेय सहलींना सूट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) होय.

(३) या बाबतचा कुठलाही प्रस्ताव विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(७६) * ३८००३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील, श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २६८०६ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालय, मुंबईच्या दिनांक ५ जुलै, २०१६ च्या अंतरिम आदेशानुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत रूजू झालेल्या विनाअनुदान शाळा, वर्ग तुकडया तसेच अंशत: अनुदानित शाळा व वर्ग तुकड्यावरील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत तसेच भविष्य निर्वाह निधी खाते सुरु करण्याबाबत गोंदिया जिल्ह्यातील श्री.रामकृष्ण भेलावे, अध्यक्ष शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कृती समिती व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिनांक ०२ ऑगस्ट, २०१६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. गोंदिया यांना व दिनांक २२ ऑगस्ट, २०१६ रोजी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना पत्र देऊन कार्यवाही करण्याची विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शिक्षण विभागातर्फे मागील १ वर्षात कोणतीही कार्यवाही न केल्याने नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ नोव्हेंबर, २०१७ रोजी शासनास निवेदन पाठवून न्यायालयीन आदेशान्वये कार्यवाही करण्याबाबत विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक १/११/२००५ पूर्वी सेवेत लागलेल्या ज्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे मा.न्यायालयात प्रलंबित आहेत त्यांची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेंतर्गत अंशदानाची कपात करण्यात येऊ नये अशा सूचना दिनांक ११/१२/२०१५ च्या पत्रान्वये निर्गमित केल्या आहेत. तसेच जुनी भविष्य निर्वाह निधी खाती मा.उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार सुरु ठेवण्याबाबत संचालक शिक्षण कार्यालयाने दिनांक २७/०३/२०१४ च्या पत्रान्वये सूचित केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे इतर शाळेत समावेशन करण्याबाबत

**(७७) * ३९२१७ श्री.बाळाराम पाटील, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील अतिदुर्गम भागातील प्राथमिक व आदिवासी शाळा पटसंख्येचे कारण दाखवून बंद करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिदुर्गम भागातील शाळा बंद केल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असल्याने त्यांचे समावेशन इतर कोणत्या शाळेत करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त भागातील विद्यार्थ्यांचे अन्य दुसऱ्या शाळेत समावेशन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) राज्य शासनाने १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजिकच्या शाळेत करण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार जव्हार तालुक्यातील एकूण ६ शाळांतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजिकच्या शाळेत करण्याचे प्रस्तावित असून सदरचे समायोजन बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ चे निकष लक्षात घेऊन करण्यात येत आहे. यामध्ये भौगोलिक किंवा नैसर्गिक अडचण असल्यास समायोजन न करण्याचे धोरण आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या देण्याबाबत

**(७८) * ३८१६५ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील : दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ३०१९३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील औरंगाबाद व नांदेड उच्चशिक्षण सहसंचालक कार्यालयांतर्गत असलेल्या त्या-त्या जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या माहे मार्च, २०१७ पर्यंतच्या पावत्या देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित जिल्ह्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड या विभागांतर्गत येणाऱ्या अशासकीय वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सन २०१६-१७ च्या भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या देण्यात आलेल्या आहेत.

(२) औरंगाबाद विभागातील एकूण ११५ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांपैकी ६९ महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील १४९२ कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या वितरीत करण्यात आल्या आहेत. उर्वरित कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या देण्याबाबत कार्यवाही सुरु आाहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनधिकृत खाजगी कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(७९) * ३८४३२ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५२०५ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने खाजगी शिकवणीला स्वतंत्र व्यवसायाचा दर्जा प्राप्त करुन देणे तथा सुनियोजनासाठी नियमावली बनविणे अपेक्षित असताना केवळ मसुदा तयार करुन खाजगी कोचिंग क्लासेसच्या व्यवसाय व व्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घातल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रोफेशनल टिचर्स असोसिएशनतर्फे शासनाला नियमावली दिली असून यासंदर्भात समितीच्या तीन बैठका झाल्या, त्यात जाचक अटी लादणार नसल्याचे सांगण्यात आले होते परंतू प्रत्यक्षात जाचक अटी लावण्यात आल्याने अटींमध्ये शासन शिथीलता आणणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच महाराष्ट्र खाजगी शिकवणी नियंत्रण अधिनियम, २०१८ नुसार खाजगी शिकवणी, कोचिंग क्लासेसचे शुल्क शासनाच्या समितीद्वारे निश्चित करण्यात येणार असून खाजगी कोचिंग क्लासेसच्या नफेखोरीला प्रतिबंध करण्यासाठी नवीन नियमावलीचा मसूदा तयार करुन त्यांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अनधिकृत खाजगी कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) राज्यातील खाजगी शिकवणी वर्गांवर नियंत्रणाकरीता अधिनियम तयार करण्याच्या अनुषंगाने विधेयकाचा मसूदा तयार करण्यासाठी दिनांक ०४/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या बैठका झाल्या असून मसूदा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यात पाणीपुरवठा करण्याबाबत

**(८०) * ३८४१९ श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यात मुबलक पाणी असूनही कडलास ग्रामपंचायत प्रशासनाचे योग्य नियोजन नसल्याने ग्रामीण भागात चार दिवसाआड पाणी सोडले जाते तसेच वाडयावस्त्यांवर पिण्याचा पाण्याचा पाणीपुरवठा करण्यात येत नसल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कडलास ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी असलेली माण नदीकाठची विहीर पूर्णपणे भरली असून आलदर मळा येथे तलावात खणलेल्या विहीरीलाही मुबलक पाणी असल्याने, तसेच शिरभावी पाणीपुरवठा योजनेचेही पाणी उपलब्ध असूनही ग्रामपंचायत अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे पाण्याबाबत योग्य नियोजन नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावठाण भागात चार दिवसातून एकदा पिण्याचे पाणी येत असल्याने ग्रामस्थांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सोलापूर यांचेकडे देखभाल दुरुस्तीसाठी असलेल्या शिरभावी प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेतून कडलास ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार प्राधिकरणामार्फत माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत पाणीपुरवठा करण्यात आला तदनंतर सांगोला तालुक्यामध्ये समाधानकारक पाऊस पडल्यामुळे स्थानिक उद्भवांना पुरेसे पाणी उपलब्ध झाल्यामुळे कडलास ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार पाणीपुरवठा बंद करण्यात आला. पुन्हा कडलास ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार दिनांक १२/०२/२०१८ रोजी दोन लक्ष लिटर व दिनांक १४/०२/२०१८ रोजी अडीच लक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात आला आहे. कडलास ग्रामपंचायतीची मागणी आल्यास शिरभावी प्रादेशिक योजनेतून पाणीपुरवठा करण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अतिरिक्त शिक्षण सेवकांना सेवेत नियमित करणेबाबत

**(८१) * ३८८२३ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे निश्चितीकरण झाले आहे काय,

(२) असल्यास, सर्व अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन अन्य शाळातून पूर्ण झाले आहे काय,

(३) नसल्यास, अतिरिक्त पदांचे कारण दाखवून शिक्षण सेवकांना सेवामुक्त करण्याची शीघ्र कार्यवाही का करण्यात आली,

(४) तसेच अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन पूर्ण होईपर्यंत बहुतांशी शिक्षणसेवक सेवेत कायम झाले असते, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, अशा शिक्षण सेवकांना शासन सेवेत कार्यरत समजून त्यांच्या सेवा नियमित होतील काय ?

**श्री.विनोद तावडे :** (१) सन २०१६-१७ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षक संख्या निश्चित झालेली आहे.

(२) नाही.

(३) संच मान्यतेत पद मंजूर नसल्याने सेवा कनिष्ठ असल्याने नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रत्यक्ष समायोजनाच्या वेळी शिक्षण सेवकांची ३ वर्ष पुर्ण झाली आहेत त्यांना सेवा संरक्षण देऊन समायोजन करण्यात आलेले आहे.

(५) शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१६ मधील तरतुदीनुसार आयुक्त, शिक्षण, पुणे यांच्यास्तरावर जेष्ठता यादी ठेवून अन्य शाळांमध्ये समायोजन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

## राज्यातील तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी संस्थामधील रिक्त पदे भरुन अद्ययावत उपकरणे देण्याबाबत

**(८२) * ३८७२५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३९३ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन ज्ञापनाव्दारे चालू आर्थिक वर्षात रुपये २५६२.८३ लक्ष इतक्या रकमेच्या विविध उपकरणे/यंत्रसामग्री खरेदीसाठी शासनस्तरावरून प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यानुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्यास्तरावर खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व आस्थापना, पदवी व पदविका संस्थांमधील गट अ व गट ब च्या पदांची सुधारित बिंदुनामावली प्रमाणित करुन घेण्याची व आकृतिबंध निश्चित करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगास रिक्त पदांच्या अनुषंगाने मागणीपत्रे सादर करण्यात आली असून ज्या पदांकरीता आयोगाकडून शिफारशी प्राप्त झाल्या आहेत, त्या पदांवरील नियुक्ती देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्त्याखालील सर्व आस्थापना, पदवी/पदविका संस्थांमधील गट अ व गट ब मधील पदांची बिंदूनामावली सुधारित स्वरुपात व ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची कार्यवाही तंत्रशिक्षण संचालनालय स्तरावर सुरु आहे. तसेच वित्त विभागाच्या दिनांक २९ जून, २०१७ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (AICTE) सन २०१८-१९ मध्ये प्रसिध्द केलेल्या कार्यपध्दती पुस्तिकेतील सूचनांच्या अनुषंगाने शासकीय/अशासकीय संस्थांमधील पदांचा आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु आहे.

(३) सुधारित स्वरुपातील बिंदुनामावली अस्तित्वात येण्यापूर्वीच्या कालावधीत प्रमाणित झालेल्या व शासनाकडून सादर करण्यात आलेल्या मागणीपत्रांच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेल्या/होणाऱ्या शिफारशींनुसार नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ऑनलाईन औषधविक्रीला प्रतिबंध करण्याबाबत

**(८३) * ३८०९१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७२५३ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोणत्याही प्रकारची औषधे ऑनलाईन पध्दतीने विक्री करण्यास शासनाने परवानगी दिलेली नसताना कोणतेही प्रिस्क्रीप्शन वापरून औषधांची बेकायदा ऑनलाईन विक्री होत असल्याने तरुण पिढीच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ऑनलाईन औषध विक्रीचा परवाना न घेता ऑनलाईन औषध विक्रीच्या जाहिराती प्रसिध्द केल्या जात असून सोशल मिडीयाचा वापर करुन गर्भपात, नशेच्या व आरोग्यास घातक औषधांच्या ऑनलाईन उपलब्धतेबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तक्रारी करून व मा.उच्च न्यायालयाने याबाबत अन्न व औषध विभागास आदेश दिले असतानाही, याप्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्यास शासन दुर्लक्ष करित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सर्वसामान्य नागरिक व युवा वर्गाच्या आरोग्याच्यादृष्टीने ऑनलाईन व बेकायदेशीर औषध विक्रीला प्रतिबंध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने औषध विक्रीस परवानगी नाही. मात्र औषधाची ऑनलाईन विक्री होत असल्याची काही प्रकरणे प्रशासनाच्या निदर्शनास आलेली आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

मात्र प्रशासनाकडून काही संकेतस्थळांची पडताळणी करण्यात आली त्यामध्ये ऑनलाईन पोर्टलद्वारे औषध विक्रीस प्रोत्साहन देणाऱ्या मध्यस्थ संस्थांचा तपास करुन त्यांचेवर कारवाई करण्यात आली आहे. मागील ३ वर्षात एकूण ७ प्रकरणी प्रथम खबर अहवाल नोंदविण्यात आले असून १४ पुरवठादाराचे परवाने रद्द, ६ पुरवठा दाराचे परवाने निलंबित, ३ प्रकरणी न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. ३ प्रकरणी व्यवसाय बंद केल्याने पुरवठादाराचे परवाने रद्द करण्यास्तव सादर केले आहे. १० प्रकरणी पुरवठादार इतर राज्यातील असल्याने कारवाईस्तव संबंधित राज्याच्या औषध नियंत्रकास कळविण्यात आले आहे. ५ प्रकरणी तपास/ कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत अनियमितता झाल्याबाबत

**(८४) * ३८२५१ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आद्य शिल्पकार नामदार नाना शंकर शेठ हयांना इंग्रजांकडून मानाने सिनेट पद बहाल केलेल्या, १६० वर्षाचा वारसा लाभलेल्या मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकांची दुरुस्ती न करता अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यामुळे हया निवडणुकीची चर्चा झाली असून २२ प्राध्यापकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत, एकाच विभागाला दोन विभागप्रमुख, प्राध्यापकांच्या जागेवर प्राचार्यांच्या सहया अशा अनेक चुकीच्या गोष्टीसाठी मुंबई विद्यापीठ प्रशासनाच्या कारभारावर अनेक विद्यार्थी संघटनेने मा.राज्यपालांकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या अनागोंदी कारभाराबाबत

**(८५) * ४०२३० श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठात एमएससी फिजिक्स या विषयाच्या तिसऱ्या सेमिस्टरची परीक्षा माहे नोव्हेंबर, २०१६ आणि चौथ्या सेमिस्टरची परीक्षा माहे एप्रिल, २०१७ मध्ये होवूनही तिसऱ्या आणि चौथ्या सेमिस्टरच्या निकालाच्या मार्कशिट्स विद्यार्थ्यांना अजूनही मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठाच्या या अनागोंदी कारभारामुळे मार्कशीट मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे विद्यार्थ्यांचे एक वर्ष वाया जावून त्यांच्या नोकरीचाही प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान पाहता मुंबई विद्यापीठाच्या कारभाराविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) एमएससी फिजिक्स या विषयाच्या तिसऱ्या सत्राच्या माहे नोव्हेंबर, २०१६ आणि चौथ्या सत्राच्या माहे एप्रिल, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेच्या गुणपत्रिकेमध्ये तांत्रिक चुका असल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक २४/०१/२०१८ रोजी सुधारित गुणपत्रिका विद्यार्थ्यांना दिल्या, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.